





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. ०५.०१.२०२६ | अंक नं. २३० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# महापालिका निवडणुकीच्या काळात अहिल्यानगर शहर दहशतीखाली

## पोलिस यंत्रणेकडून ठोस कारवाईची गरज, अन्यथा पडतील एकमेकांचे मुडदे


नगर – महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली आहे. मात्र यावेळी ही निवडणूक वेगळ्याच वळणावर गेली असल्याचे दिसून येत आहे. भोसले आखाड्यात राजकीय वादातून झालेल्या मारामाऱ्या आणि खुनी हल्ला ताजा असताना मुकुंदनगरमध्येही ३ जानेवारीला रात्री मोठी दहशत आणि गुंडगिरी पाहायला मिळाली. विरोधात प्रचार करणाऱ्या तरुणाला उमेदवारानेच मारहाण केली व त्याच्या साथीदाराने डोक्याला गावठी कट्टा लावून धमकावल्याची घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी फक्त बघ्याची भूमिका न घेता ठोस कारवाई करण्याची गरज आहे. नाहीतर टोकाच्या राजकीय वादातून एकमेकांचे मुडदे पडल्याशिवाय राहणार नाही.

अहिल्यानगर शहरात या पूर्वीही महापालिका निवडणुकीच्या वादातून केडगाव मध्ये दुहेरी हत्याकांड घडले होते. ७ वर्षांपूर्वी दोन शिवसैनिकांची धारदार हत्याराने वार करत आणि गावठी कट्ट्यातून गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. हे हत्याकांड राज्यभर गाजले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रदीर्घ कालावधीनंतर होत असल्याने राज्यभर राजकीय कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जोश आहे. त्यातूनच टोकाचा राजकीय संघर्ष सुरु आहे. या राजकीय संघर्षातून अनेक ठिकाणी हाणामाऱ्या होत खुन पडलेले आहेत. नगरमध्ये ही ४-५ दिवसांपूर्वी भोसले आखाड्यात राजकीय राडा झाला होता. त्यातून एकावर खुनी हल्लाही झालेला आहे. हे सर्व प्रकार पाहता पोलिसांना अधिक सतर्क राहावे लागणार आहे.

### मुकुंदनगरमध्ये गावठी कट्ट्याने धमकावले उमेदवारासह समर्थकांवर गुन्हा दाखल

महापालिका निवडणुकीत विरोधात प्रचार करतो म्हणून २१ वर्षीय तरुणाला मारहाण करत डोक्याला गावठी कट्टा लावून धमकावल्याची घटना ३ जानेवारीला रात्री ११ च्या सुमारास घडली आहे. याबाबत यासिर अन्सार सय्यद (रा.दर्गादायरा, मुकुंदनगर) याने भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी याची मावशी शेख नसीम खानसाहेब ही निवडणूक लढवत असल्याने फिर्यादी यासिर हा तिचा प्रचार करत आहे. ३ जानेवारीला रात्री ११ च्या सुमारास तो त्याच्या मित्रांसह अलअमिना मैदान मुकुंदनगर येथे थांबलेला असताना त्या ठिकाणी प्रभाग ४ मधील एमआयएम चा उमेदवार आणि माजी नगरसेवक समद वहाब खान, सॅम उर्फ समीर जाफर खान, खालिद दिलदार शेख, सोफियान समद खान, माजीद समद खान, मुजीब उर्फ भुऱ्या अजीज खान, नावेद रशीद शेख हे सर्व जण मोपेड वर आले. त्यांच्या हातात लाकडी दांडके होते.

यावेळी समदखान व सॅम याने आमच्या विरोधात प्रचार केला तर वाईट परिणाम होतील अशी धमकी दिली. तर इतरांनी शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी त्यांना मी तुमच्या विरोधात नाही तर माझ्या मावशीचा प्रचार करत आहे असे म्हणाला असता समदखान याने त्याची गचांडी पकडून तोंडात चापट मारली. त्यावेळी फिर्यादी म्हणाला मला मारू नका नाहीतर पोलिस केस करील. असे म्हणताच सॅम याने कमरेचा गावठी कट्टा काढून फिर्यादीच्या डोक्याला लावला आणि तुला जीवे ठार मारून टाकेल, तुम्ही लय माजले आहात, असे केल्याशिवाय यांची विरोधात प्रचार *(पुढील मजकूर पान २ वर)*









जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com





महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांचा प्रचाराचा शुभारंभ भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाल्यावर शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप यांच्यासह सर्व उमेदवार व दोन्ही पक्षाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते.

# महापालिकेवर युतीचा महापौर बसवण्याची जबाबदारी नगरकरांची

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आवाहन, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांचा प्रचाराचा शुभारंभ

नगर – राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी निर्माण झालेले वातावरण पाहता सर्व महापालिकांमध्ये युतीची सत्ता येईल व जास्तीत जास्त महापौर युतीचेच होतील अशी शक्यता आहे. महापालिकेच्या विकासासाठी केंद्र व राज्य प्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिकेतही युतीच्या विचाराची सत्ता येणे आवश्यक आहे. अहिल्यानगरमध्ये पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप तसेच दोन्ही पक्षांचे पदाधिकारी निवडणुकीसाठी चांगले उत्कृष्ट नियोजन करत आहेत. शहर स्मार्ट व्हावे आधुनिक इन्फ्रास्ट्रक्चर नगरमध्ये यावे, यासाठी केंद्र व राज्य सरकार निधी देत आहे. त्यामुळे जनतेने भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्याच मागे उभे रहावे. अहिल्यानगर शहरात युतीचाच महापौर बसवण्याची जबाबदारी मी सर्व जनतेवर देत आहे, असे आवाहन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.

महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते ५ जानेवारी रोजी सकाळी ग्रामदैवत विशाल गणपती मंदिरात महाआरती करून व नारळ वाढवून झाला. त्यावेळी ते दिल्लीगेट येथील सभेत व प्रसिद्धी माध्यमांशी बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंधारण मंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आ.संग्राम जगताप, भाजपचे महामंत्री विजय चौधरी व रवींद्र अनासपुरे, निवडणूक प्रमुख आ.विक्रमसिंह पाचपुते, भाजपा शहर अध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, विनायक देशमुख, सुनील रामदासी, माणिकराव विधाते यांच्यासह दोन्ही पक्षांचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.


यावेळी माळीवाडा ते दिल्लीगेट अशी प्रचार रॅली काढण्यात आली. प्रचार रॅलीत जीपमध्ये प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप होते. दिल्ली गेट येथे प्रचार रॅली आल्यावर त्या ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे आमदार संग्राम जगताप यांनीही मनोगत व्यक्त करून महानगरपालिकेत युतीचाच महापौर होण्यासाठी भाजपा राष्ट्रवादी युतीच्या उमेदवारांना निवडून द्यावे, असे आवाहन केले.

## सदाशिव तनपुरे यांचे वृद्धपकाळाने निधन



नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक या शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक आणि वासुंदे येथील भाऊसाहेब महाराज शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव, कॅप्टन सदाशिवराव हरिभाऊ तनपुरे (वय ९१) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे राष्ट्रीय खेळाडू प्रमोद तनपुरे, स्टार हेल्थ चे सेल्स मॅनेजर चंद्रशेखर तनपुरे, डॉक्टर व सामाजिक कार्यकर्त्या ज्योती चोपडे, डॉ.विनोद चोपडे आदी मुले, मुली, जावई, तसेच सून, नातवंडे, परतंडे असा परिवार आहे. ते उत्कृष्ट खेळाडू होते.

## रतिलाल बोरा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – राऊत मळा, आदिनाथ कॉलनी येथील रहिवासी रतिलाल धनराज बोरा (वय ८६) यांचे ४ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ भाऊ, पत्नी, भावजया, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते रमेशलाल, सुरेशलाल यांचे मोठे बंधू तर अतुल बोरा यांचे वडील होत.

## कचरदास गुगळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – आगरकर मळा झेडपी कॉलनी येथील रहिवासी कचरदास निहालचंद गुगळे (सावरगाववाला) (वय ९०) यांचे ४ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, १ मुलगी, ६ नातवंडे, नात सुना, पंतु, जावई असा परिवार आहे. ते साधना, रुपपंच, ललीत, प्रविण यांचे वडील होत तर प्रितेश, नितेश, शुभम, प्रणव, अभय यांचे आजोबा होत.

## सुशिलाबाई छाजेड यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी श्रीमती सुशिलाबाई केवळचंद छाजेड (वय ९०) यांचे ४ जानेवारीला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे १ मुलगा, ४ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. उद्योजक अभय छाजेड यांच्या त्या मातोश्री होत.

## महापालिका निवडणुकीच्या काळात अहिल्यानगर शहर दहशतीखाली

*(पान १ वरुन)*

करायची हिंमत होणार नाही. असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली.

त्यानंतर सर्वांनी फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीच्या मित्रांनी त्याला बाजूला घेत या सर्वांच्या तावडीतून सोडवले व आरडाओरडा केल्याने सर्वजण तेथून निघून गेले. असे या फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी समद खान सह सर्वांच्या विरुद्ध दंगा, आर्म अॅक्टसह जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

### दुसऱ्या घटनेत तरुणावर केले चॉपरने वार

राजकीय वादातून एका तरुणावर चॉपरने वार केल्याची दुसरी एक घटना मुकुंदनगर मध्ये ३ जानेवारीला रात्री ११.३० च्या सुमारास घडली आहे. समद मेंबरचे व्हिडीओ इंस्टाग्राम वर पोस्ट करतो म्हणून अब्रार मुख्तार शेख (वय २३, रा.आलमगीर, भिंगार) याच्यावर हे वार करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. याबाबत त्याने भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून अफजल आसीर शेख, अस्लम आसीर शेख या दोघांवर खुनाचा प्रयत्न, आर्म अॅक्ट आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांनी व त्यांच्या सोबतच्या अनोळखी ४ ते ५ जणांनी डोक्याला बंदूक लावून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करत चॉपरने वार केल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.



केडगाव प्रभाग क्रमांक १६ मध्ये अपक्ष पॅनलच्या निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

## केडगावमध्ये 'अपक्ष' पॅनल महापालिका निवडणुकीच्या मैदानात


नगर – महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत केडगाव प्रभाग क्रमांक १६ मध्ये एका नव्या राजकीय समीकरणाचा उदय झाला आहे. केडगावचा 'स्वाभिमान' आणि प्रलंबित प्रश्न मांडण्यासाठी चार तरुण उमेदवारांनी एकत्र येत अपक्ष पॅनलच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे. ग्रामदैवत रेणुका माता आणि भैरवनाथ यांचे दर्शन घेऊन या पॅनलच्या प्रचाराचा धडाक्यात शुभारंभ करण्यात आला.

केडगावच्या विकासाचा नवा आराखडा घेऊन प्रभाग क्रमांक १६ मध्ये अ गट विमल दादू कांबळे, ब गट सविता अशोक कराळे, क गट सागर अंजाबापू सातपुते, ड गट भूषण अशोक गुंड हे निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. आमच्या नेत्यांनी केडगावकरांना कोथरूडसारखा विकास करण्याचे जे स्वप्न दाखवले होते, ते आजही अधुरेच आहे. केडगावातील महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा खाली उतरवण्यासाठी आणि केडगावकरांचा स्वाभिमान जिवंत ठेवण्यासाठी ही लढाई आम्ही हाती घेतली आहे असा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला.

प्रचाराची सुरुवात करताना उमेदवारांनी प्रथम केडगाव वेस येथील भैरवनाथांचे दर्शन घेतले. त्यानंतर महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ग्रामदैवत रेणुका मातेच्या चरणी साकडे घालून केडगावच्या उज्वल भविष्यासाठी शक्ती द्यावी अशी प्रार्थना करण्यात आली. प्रभागातील रस्ते, पाणी आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत समस्या आजही कायम असल्याचा आरोप उमेदवारांनी केला आहे. हा अपक्ष अर्ज केवळ निवडणुकीपुरता नसून केडगावच्या अस्तित्वाचा लढा आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. नागरिकांच्या आग्रहाखातर व त्यांच्या विश्वासावर आम्ही ही निवडणूक लढवत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी माजी नगरसेवक सुनील कोतकर, विठ्ठल कराळे, पोपट कराळे, अंजाबापू सातपुते, गोविंद कोतकर, सुनील उमाप, पोपट साठे, सुभाष कार्ले, माजी नगरसेवक, प्रभागातील नागरिक ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ, महिला उपस्थित होत्या.

## सुभाषलाल गुगळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – स्वप्नपूर्ती भिगवन बारामती रोड येथील रहिवासी सुभाषलाल धनराज गुगळे (वय ७८) यांचे ५ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कसबा बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, पत्नी, नातवंडे असा परिवार आहे. ते रोहित, राहुल यांचे वडील तर संस्कृती, काव्या, युग, लक्ष, यांचे ते आजोबा होत.

## अशोक सोनवणे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – येथील रिक्षा युनियनचे उपाध्यक्ष अशोक मोतीलाल सोनवणे (वय ५३) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, दोन मुले, एक मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आडत व्यापारी रमेश सोनवणे यांचे धाकटे बंधू, चि.सागर व धिरज यांचे वडील, प्रसाद व सिद्धार्थ सोनवणे यांचे चुलते होत.

## मिराबाई मोरे यांचे दु:खद निधन



नगर – मोरेवस्ती, वांबोरी, ता. राहुरी येथील रहिवासी सौ. मिराबाई सुभाष मोरे (वय ४७) यांचे ५ जानेवारी रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोरे वस्ती, वांबोरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा असा परिवार आहे. त्या सुभाष मोरे (शाखाधिकारी, न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी) यांच्या पत्नी तर अॅड. चाणक्य मोरे यांच्या मातोश्री होत.

## सुमती देशपांडे यांचे वृध्दापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील श्रीमती सुमती बाळकृष्ण देशपांडे (वय ९८) यांचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, पुतणे, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. हिंद सेवा मंडळाचे कार्यकारी सदस्य अनिल देशंपाडे व मोहिनी हॉस्पिटलचे स्त्रीरोग तज्ञ डॉ.अजित देशपांडे यांच्या मातोश्री होत.

## घनशाम पुरोहित यांचे अल्प आजाराने निधन



शेवगाव – निजी निवास, मारवाडी गल्ली, शेवगाव येथील रहिवासी घनशाम किसनलाल पुरोहित (वय ७०) यांचे ४ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शेवगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ भाऊ, भावजय, पत्नी, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. अविनाश पुरोहित यांचे ते वडील होत.

# शिक्षण सेवा राजपत्रित अधिकाऱ्यांच्या १९ जानेवारीपासून होणाऱ्या 'कामबंद आंदोलना'स शिक्षक संघटनांचा पाठिंबा

## आंदोलनामुळे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार रखडणार नाहीत : शिक्षणाधिकाऱ्यांचे आश्वासन



अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीची महत्त्वपूर्ण बैठक अशोकभाऊ इंग्लिश मीडियम स्कूल येथे पार पडली.

नगर – अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच अशोकभाऊ इंग्लिश मीडियम स्कूल, नगर येथे पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी समन्वय समितीचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित होते. बैठकीत शालेय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांवर सुरू असलेल्या विना चौकशी व विनापरवानगी अटक सत्राबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली.

शालेय शिक्षण विभागातील अधिकारी सध्या प्रचंड मानसिक दबावाखाली काम करत असून, सुरू असलेल्या कारवायांमुळे त्यांच्या मनोबलाचे खच्चीकरण होत आहे. याचा थेट परिणाम कार्यालयीन कामकाजावर होत असल्याचे मत यावेळी मांडण्यात आले. गृह विभागाने या बेलगाम अटक सत्राचा तातडीने फेरविचार करावा तसेच दोष सिद्ध होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याची स्पष्ट धोरणात्मक भूमिका जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर अखिल महाराष्ट्र राज्य शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने १९ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा दिला असून, या आंदोलनास अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर समन्वय समितीने जाहीर पाठिंबा दिला आहे. या पाठिंब्याचे पत्र जिल्हा शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर व अधीक्षक संध्या भोर, कार्यालय अधीक्षक महावीर दोधाड यांना सादर करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष व माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे अध्यक्ष बाबासाहेब बोडखे, भाजप शिक्षक सेलचे अध्यक्ष वैभव सांगळे, शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे, माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाचे विभागीय सचिव गोवर्धन पांडुळे, मुख्याध्यापक संघाचे जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गडदे, शिक्षक परिषदेचे खजिनदार प्रसाद सामलेटी, उपाध्यक्ष दिलीप रोकडे, माध्यमिक शिक्षक संघटनेचे उद्धव गुंड, कला अध्यापक संघाचे अध्यक्ष अशोक डोळसे यांच्यासह प्रशांत सुरसे, प्रशांत मस्के, पानसरे आदी विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, जिल्हा शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्याशी झालेल्या चर्चेत संघटनेने आंदोलनास पाठिंबा देत असतानाच जिल्ह्यातील कोणत्याही मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार आंदोलनामुळे उशिरा होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशी ठाम भूमिका मांडली. त्यावर शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी आंदोलनास पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानत जिल्ह्यातील कोणाच्याही पगारात विलंब होणार नाही, सर्व पगार तातडीने अदा करण्यात येतील, असे स्पष्ट आश्वासन दिले.

## रेल्वे स्टेशनकडे पायी जाणाऱ्या प्रवाशाला लुटले

नगर – शहरातील रेल्वे स्टेशनकडे पायी जाणाऱ्या एका प्रवाशाला शिवनेरी चौकात अडवून तिघांनी बेदम मारहाण करत लुटल्याची घटना ४ जानेवारी रोजी पहाटे घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकेश कुमार बिरजा सिंग (वय २७, मुळ रा. झारखंड, हल्ली रा. कोरेगाव, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी कामानिमित्त कोरेगाव येथे वास्तव्यास आहे. ४ जानेवारी रोजी पहाटे ते आपल्या गावी जाण्यासाठी पुणे बसस्थानकावर उतरले होते. तिथून रेल्वे स्टेशनला जाण्यासाठी रिक्षा न मिळाल्याने त्याने पायी जाण्याचा निर्णय घेतला. पहाटे पावणेतीनच्या सुमारास तो शिवनेरी चौकात आले असता, एका दुचाकीवरून तीन अनोळखी व्यक्ती तिथे पोहोचल्या. संशयित आरोपींनी दुचाकीवरून खाली उतरून आकाशला घेराव घातला. एकाने त्यांच्या खिशातील फोन हिसकावण्याचा प्रयत्न केला, तर दुसऱ्याने त्याच्या खांद्याला लटकलेली बॅग ओढून घेतली.

आकाशने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता, संशयित आरोपींनी त्याला मारहाण केली. एका आरोपीने हातातील लोखंडी कड्याने आकाशच्या बरगडीवर प्रहार केला, तर दुसऱ्याने त्याच्या गळ्यावर नख्यांनी ओरखडले. या झटापटीत आकाशचा मोबाईल जमिनीवर पडून फुटला. आरोपींनी त्यांच्या खिशातील ४०० रूपयांची रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग जबरदस्तीने चोरून नेली. घटनेनंतर आरोपी दुचाकीवरून पसार झाले. जखमी अवस्थेत आकाशने पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला असून पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील अधिक तपास करत आहेत.

## नृत्य दर्पण नृत्य अकादमीच्या मैत्रेयी भावे, रिया कुलकर्णी यांचे यश



नगर–इंटरनॅशनल ट्रॅडिशनल डान्स काँग्रेस विशाखापट्टणम आयोजित नृत्य स्पर्धेत नृत्य दर्पण नृत्य अकादमीच्या मैत्रेयी भावे हिला भरतनाट्यम भरतनाट्यम सीनियर विभागात तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले व रिया कुलकर्णी हिला भरतनाट्यम युथ विभागात तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. या दोघींना संस्थेच्या संचालिका सौ. अपर्णा रोहित थत्ते यांचे मार्गदर्शन लाभले.

## भास्कर वाव्हळ यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील सेवानिवृत्त नायब तहसीलदार भास्कर राधाकिसन वाव्हळ (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, तीन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. कोल्हार येथील स्त्रीरोग तज्ञ डॉ.रमेश वाव्हळ यांचे थोरले बंधू, महेश, संदिप व राजेश वाव्हळ यांचे वडील होत.

## श्री संत जळोजी-मळोजी पुण्यतिथीनिमित्त ७ जानेवारीला कार्यक्रम

नगर – अहिल्यानगर जिल्हा विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज ट्रस्ट अहिल्यानगर यांचे वतीने ७ जानेवारी रोजी संस्थेच्या नवीन टिळक रोड, अहिल्यानगर येथील कार्यालयात श्री संत जळोजी–मळोजी महाराज पुण्यस्मरण कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष, मुरलीधर वाघमारे तसेच सर्व विश्वस्त मंडळ यांचे वतीने साजरी करण्यात येणार आहे.

कार्यक्रमांतर्गत सकाळी ठिक १० ते ११ वाजता श्री संत जळोजी– मळोजी यांचे पोथी वाचन होईल. तसेच सकाळी ११ वा. दिप प्रज्वलन व संताच्या प्रतिमेचे पुजन संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ यांचे हस्ते हार घालून महाआरती करण्यात येईल कार्यक्रमानंतर चहा पाणी व अल्पोहाराचा कार्यक्रम ठेवण्यात आलेला आहे.

तरी या कार्यक्रमास सभासद, समाज बांधव, तसेच सुतार समाजातील बंधू–भगिनींनी उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर वाघमारे, उपाध्यक्ष तुकाराम सुतार, सचिव राधाकृष्ण वाकचौरे, सहसचिव प्रभाकर वाघमारे, खजिनदार रावसाहेब वाघमारे, विश्वस्त सतिश क्षीरसागर, श्रीराज भागवत, अनिल मोरे, हरिभाऊ भालेराव, दिलीप गडकर, श्री.राजेंद्र क्षीरसागर यांनी केले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### हिवाळ्यात घरीच करा व्यायाम

आजारांपासून दूर राहण्यासाठी आपली प्रतिकारशक्ती मजबूत असणे अत्यंत आवश्यक आहे. हवामानातील बदलासोबत तुम्ही तुमच्या काही सवयीही बदलल्या पाहिजेत. वाढत्या थंडीबरोबर आपल्यामध्ये आळसही वाढू लागतो.

अशा परिस्थितीत, बहुतेक लोक व्यायाम सोडून देतात. जिम किंवा पार्कमध्ये जाऊन व्यायाम करण्यात लोक सर्वात आळशी असतात. पण व्यायामासाठी तुम्ही जिममध्ये जावेच असे नाही. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही घरीही काही व्यायाम करू शकता.

## पाककला

### बाजरीची लापशी

**साहित्य :** बाजरीचे पीठ: १ वाटी (बाजरी स्वच्छ धुवून, वाळवून जाडसर दळून घ्यावी किंवा मिक्सरवर फिरवून घ्यावी) गूळ: ३/४ ते १ वाटी (तुमच्या आवडीनुसार गोडवा कमी-जास्त करू शकता) पाणी: ३ ते ४ वाट्या, तूप: २ ते ३ मोठे चमचे, वेलची पूड: अर्धा चमचा, सुका मेवा: काजू, बदाम, मनुके (ऐच्छिक), किसलेले ओले खोबरे: २ चमचे (ऐच्छिक),

**कृती :** एका कढईत किंवा प्रेशर कुकरमध्ये २ चमचे तूप गरम करा. त्यात बाजरीचे पीठ घालून मंद आचेवर छान खमंग वास येईपर्यंत (साधारण ५-७ मिनिटे) भाजून घ्या. दुसरीकडे एका पातेल्यात ३-४ वाट्या पाणी गरम करायला ठेवा. लापशीसाठी नेहमी गरम पाण्याचाच वापर करावा, जेणेकरून ती मऊ शिजते. भाजलेल्या पिठात गरम पाणी ओता. व्यवस्थित ढवळून घ्या जेणेकरून गुठळ्या होणार नाहीत. आता कुकरचे झाकण लावून मंद ते मध्यम आचेवर ३ ते ४ शिट्ट्या करून घ्या. (जर कढईत करत असाल, तर झाकण ठेवून मऊ होईपर्यंत शिजवा). पीठ पूर्णपणे शिजल्यानंतर त्यात किसलेला गूळ घाला. गूळ विरघळेपर्यंत सतत ढवळत राहा. एका छोट्या कढईत थोडे तूप गरम करून त्यात सुका मेवा परतून घ्या आणि हे लापशीवर ओता. सोबतच वेलची पूड आणि किसलेले खोबरे घालून मिक्स करा. सगळे जिन्नस एकत्र झाल्यावर पुन्हा २-३ मिनिटे मंद आचेवर झाकण ठेवून एक वाफ काढा, जेणेकरून गुळाचा गोडवा रव्यात छान मुरेल.

## वास्तू

### घरात ठेवा मनी बाऊल

✻ बाऊल सजवण्यासाठी योग्य दिशा देखील महत्त्वाची ठरते. फेंगशुईप्रमाणे घराच्या काही खोल्या किवा दिशा सौभाग्याशी जुळलेल्या असतात.

✻ विशेष करुन घराचा मुख्य दरवाजा आणि लिव्हिंग रूम धनाला आपल्याकडे आकर्षित करतात. फेंगशुई मनी बाऊल ठेवल्यासाठी हे स्थान अत्यंत शुभ आहे. मात्र बाथरुम, सिंक आणि नाल्याजवळ मनी बाऊल ठेवू नये.

## सौंदर्य

पाय ठेवण्यासाठी पॅडीक्यूअरचा अवश्य वापर करा. कारण पायाची नखे, टाच यांच्या स्वच्छतेचा हा एक चांगला उपाय आहे.

## सल्ला

✻ पालक उकळवून घ्या आणि मिक्सर मध्ये वाटून डीप-फ्रीज मध्ये ठेवा. पालक पनीर बनविताना आपण ह्याचा वापर करू शकता.

✻ शेंगदाणे भाजून त्याचा कूट बनवून ठेवा. फराळाचं करताना आपला वेळ वाचेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६

**अंगारक चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, आश्लेषा १२।१८, सूर्योदय ०६ वा. ४३ मि. सूर्यास्त ०५ वा. २१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** महत्त्वाच्या आर्थिक करारांच्या वेळी आकस्मिक विचार करून निर्णय घेऊ नका. अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ झाल्याने तुमची मन:शांती ढळेल.

**वृषभ :** तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. आरामात राहण्याचा आनंद आज लुटू शकाल.

**मिथुन :** तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस.

**कर्क :** आजचा दिवस विशेष साजरा करण्यासाठी आपल्या कुटुंबासोबत कॅण्डललाईट डीनरचा आस्वाद घ्या.

**सिंह :** समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. मित्रांकडून सायंकाळी एखादा रोमांचक प्लॅन आखल्यामुळे आजचा दिवस खूपच सुंदर असेल.

**कन्या :** आज तुमची प्रकृती फारशी बरी नसल्यामुळे तुम्हाला तुमच्या कामावर लक्ष केंद्रीत करणे जड जाईल.

**तूळ :** आजच्या दिवशी तुम्ही प्रेमपाशात बांधले जाणार आहात. या परमानंदाचा अनुभव घ्या. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ.

**वृश्चिक :** तुमच्या नवीन योजना, प्रकल्प याविषयी तुमच्या पालकांना विश्वासात घेऊन सांगण्यासाठी काळ उत्तम आहे.

**धनु :** आपल्या पालकांना खुश करण्यासाठी अभ्यास आणि खेळ यांचा समतोल साधा. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल.


**मकर :** अन्य देशांतील लोकांशी व्यावसायिक संपर्क प्रस्थापित करण्यासाठी सध्याचा काळ अतिशय योग्य आहे. वैवाहिक आयुष्य आजच्याइतकं सुखद कधीच नव्हतं,

**कुंभ :** जेवणात मीठाची गरज ही अपिरहार्य असते, आपल्याला आनंदाची, सुखाची खरी किंमत कळण्यासाठी दुखाची गरज भासतेच.

**मीन :** कुटुंबातील सदस्य तसेच मित्रमंडळी यांच्यासाठी खर्च करून मजा लुटाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७३४० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) लांब मानेचा एक जंगली प्राणी ३) आकाशातून जाणारे एक वाहन ६) नैसर्गिक; उद्देशावाचून ८) कडक पाठ असलेला एक जलचर १०) गव्हाचे कणीदार पीठ ११) मनुष्य; मानव १३) सुवर्ण; कांचन; सोने १४) जिचा पती वारला आहे अशी स्त्री; विधवा १६) कानाची कड; काठचा प्रदेश १७) वाणी; जीभ; जिव्हा १८) फुलातील गोड रस; मकरंद २०) दिन; दिवस; दिस २२) मुलगा; पुत्र; सुत; पूत २३) लक्ष्मीपती; विष्णू

**उभे शब्द :-** १) जेवढा २) ठकबाजी; ठकविणे ३) पुरुषाचे एक वस्त्र; तुमान; पायजमा ४) महिना; माह ५) कालवा; पाट ७) अत्यंत प्रिय ९) सारखा; पंचप्राणांपैकी एक; बरोबर १२) हेतू; योजना १३) अफलातून काम; युक्ती; शक्कल १४) गळ्यात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिन १५) शुभ्र पांढरा १६) अलगूज; मुरली; बासरी १९) वित्त; संपत्ती; संपदा २१) विष्णुपत्नी; लक्ष्मी

### शब्दगंध क्र. ७३३९ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** सुधारणे आणि बिघडणे हे व्यक्तीच्या स्वभावावर असते परिस्थितीवर नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पाळीव प्राणी आजारी असल्याचे कसे समजते?

तुमच्या पाळीव प्राण्यांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. पशुवैद्यकाकडे नियमित भेट देणे आवश्यक आहे. कधीकधी आपले पाळीव प्राणी आजारी पडतात, परंतु त्यांना पशुवैद्यकाकडे कधी घेऊन जावे हे आपल्याला माहित नसते.

जर तुमच्या पाळीव प्राण्याला अचानक खाणे बंद झाले किंवा अन्नात रस नसेल, तर त्यांना पशुवैद्यकाकडे नेणे हे एक महत्त्वाचे लक्षण असू शकते. अपचन कधीकधी गंभीर आजाराचे लक्षण असू शकते, म्हणून त्याकडे दुर्लक्ष करू नका. विशेषतः जर हे २४ तासांपेक्षा जास्त काळ टिकत असेल, तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांची तपासणी करा.

जर तुमच्या पाळीव प्राण्याला वारंवार उलट्या होत असतील, तर त्यांना पशुवैद्यकाकडे नेणे हे देखील एक महत्त्वाचे लक्षण असू शकते. उलट्या कधीकधी पोटाच्या संसर्गाचे किंवा इतर गंभीर समस्यांचे लक्षण असू शकते, म्हणून त्याकडे दुर्लक्ष करू नका. विशेषतः जर ते कायम राहिले तर, वेळेवर काळजी आणि आराम मिळावा म्हणून ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या. सुस्ती

जर तुमच्या पाळीव प्राण्याला थकवा जाणवत असेल किंवा त्यांची उर्जा पातळी कमी असेल, तर हे एक महत्त्वाचे लक्षण असू शकते की त्यांना पशुवैद्यकाकडे नेले पाहिजे. सुस्ती कधीकधी गंभीर आजाराचे लक्षण असू शकते, म्हणून त्याकडे दुर्लक्ष करू नका. विशेषतः जर ते २४ तासांपेक्षा जास्त काळ टिकत असेल, तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्याचे मूल्यांकन करा.

जर तुमच्या पाळीव प्राण्याला श्वास घेण्यास त्रास होत असेल किंवा जलद श्वास येत असेल, तर हे एक महत्त्वाचे लक्षण असू शकते की त्यांना पशुवैद्यकाकडे नेले पाहिजे. श्वास घेण्यास त्रास होणे कधीकधी फुफ्फुसांच्या किंवा हृदयाच्या समस्यांचे लक्षण असू शकते, म्हणून त्याकडे दुर्लक्ष करू नका. विशेषतः जर ते कायम राहिले तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्याचे मूल्यांकन करा.

जर तुमच्या पाळीव प्राण्याला अचानक राग किंवा भीती वाटली किंवा ते अत्यंत चिडचिडे झाले, तर हे एक महत्त्वाचे लक्षण असू शकते की त्यांना पशुवैद्यकाकडे नेले पाहिजे. वर्तनातील बदल कधीकधी मानसिक ताण किंवा इतर समस्यांचे लक्षण असू शकतात, म्हणून त्याकडे दुर्लक्ष करू नका.

या सर्व लक्षणांकडे लक्ष देणे आणि तुमच्या पाळीव प्राण्याची योग्य काळजी घेणे महत्वाचे आहे.

### समुद्र आणि कावळा

अनेक वर्षांपूर्वी, एक नर आणि एक मादी कावळा समुद्राच्या पाणयात उत्साहाने खेळत होते. आता कावळीण एका माघारी येणाऱ्या लाटेत वाहून गेली आणि एका माशाने तिला गिळंकृत केले. आता हे पाहून नर कावळा खूप दुःखी झाला. तो मोठ्याने रडू लागला. त्याच्या आवाजाने काही क्षणातच शेकडो कावळेही तिथे जमले. जेव्हा इतर कावळ्यांनी ही दुःखद घटना ऐकली तेव्हा तेही मोठ्याने ओरडू लागले.

मग एका कावळ्याने म्हटले, कावळे इतके रडताय का? तुम्ही सर्व समुद्रापेक्षाही शक्तिशाली आहात. तुम्ही आपल्या चोचीत समुद्राचे पाणी भरून फेकून देत का नाहीत?

सर्व कावळ्यांनी ही कल्पना चांगली मानली आणि चोच समुद्राच्या पाण्याने भरून दूरच्या किनाऱ्यावर टाकू लागले. पण त्यांना समुद्राच्या शक्तीची जाणीव न्हवती. तसेच त्यातील एक कावळा म्हणू लागला की, समुद्राने कावळीणला वाहून नेण्याची हिम्मत कशी केली? मग मग दुसऱ्या कावळ्याने म्हटले, आपण समुद्राला धडा शिकवू. कावळ्यांच्या मूर्खपणावर समुद्र नाराज झाला आणि त्याने त्या सर्वांना एका शक्तिशाली लाटेत वाहून नेले.

तात्पर्य : कधीही कोणतीही गोष्ट करतांना नेहमी विचारपूर्वक करावी.

## जीवन का अमृत (भाग १)



रूहानी मंजिल के लिए किया गया हर काम आपके खाते में लिखा जाता है और वह भविष्य में आपके साथ रहेगा ।

कर्मों का हिसाब चुकाना वास्तव में एक मुख्य बात है, जिसके लिए प्यारे दीक्षितों को प्रेम, नम्रता और धर्मनिष्ठा से भरा अनुशासित जीवन जीने के लिए कहा जाता है। आपको, सिर पर कार्यरत गुरु-शक्ति से अधिकाधिक दया की भेंट मिलेगी।

६७. आध्यात्मिक विरासत (पिछले जन्मों में पाई रूहानी तरक्की) हर एक की आंतरिक उन्नति में बहुत महत्वपूर्ण है, पर सच्चे और निरंतर प्रयास, जो सतगुरु की छत्र-छाया में किए गए हों, कभी व्यर्थ नहीं जाते और समय आने पर फलीभूत होते हैं और वह भी बहुत मात्रा में। आप यह पक्की तौर

### रुहानी मंजिल

से जान लें कि पर्दे के पीछे सब कुछ लिखा जा रहा है और दयालु गुरु-शक्ति आप के अंतर की गहराईयों में छुपी इच्छाओं से भली भाँति वाकिफ है एक सच्चे संत की दया और कृपा से हम जो जाती (निजी) अनुभव पाते हैं, वह, अपने आप में, मृत्यु की समस्या का हल है

जब तक आप दोबारा जन्म नहीं लेते, आप प्रभु के साम्राज्य में प्रवेश नहीं पा सकते। अतः दोबारा जन्म लेना है, शरीर से ऊपर उठना और दूसरे संसार में प्रवेश करना, स्थूल से सूक्ष्म में। हम ारी खुशी की उस समय कोई सीमा नहीं होती, जब हमें उस रहस्य का पता चलता है, जिसने सदियों से इंसान को परेशान किया है।

दिव्य अमृत अंतर्मुख होने से मिल सकता है, यह बाहरी संसार में कहीं भी नहीं पाया जाता। हम इसे केवल तभी पाते हैं, जब हम स्थूल शरीर से ऊपर उठकर आध्यात्मिक मंडलों में प्रवेश करें ।

मुझे खुशी है कि आप प्रेमपूर्वक भजन-सिमरन कर रहे हैं तथा आपको विभिन्न रंगों और ज्योतियों का वरदान मिला है।

आपने यह नहीं लिखा कि आप कैसा शब्द सुनते हैं।

७०. क्योंकि प्रभु अंतर में वास करता है, अतः हमें अंतर में झाँकना होगा, अगर हम उससे मिलना चाहते हैं, उसका अनुभव पाना चाहते हैं और उसका आशीर्वाद चाहते हैं। हम उसकी आवाज़ नहीं सुन सकते, जब तक कि हम संसार के चक्रव्यूह से मुँह नहीं फेर लेते और अंतर में आत्मा की

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

साधारण नमक में मिलता है। पोटेशियम मास पशियों के सकुचन म भाग लेता है। यह शाक सब्जियों एवं दूध में पाया जाता है। सल्फर सभी ऊतकों के लिये जरूरी है। ये सभी प्रोटीन वाले पदार्थों में मिलता है। क्रोमीयम ग्लूकोस और इंसुलिन बनाने के लिये जरूरी होता है। यह सब्जियों और गेहूँ के आटे में मिलता है। मेगजीन हीमोग्लोबिन और पाचक रसों के लिये इनजाईम बनाता है। यह केले, सेम, पत्तेदार सब्जियों, अनाज तथा मेवों में मिलता है।

आज्ञा चक्र -४८-मन-

-दिमाग को शक्तिशाली बनाने वाला भोजन

टीचर सब को एक जैसा पढ़ाता है, कोई मेरिट लेता है कोई फेल हो जाता है। दफ्तर में माहौल एक जैसा होता है कोई बढ़िया कहलाता है कोई घटिया । इसका कारण यह है कि हरेक व्यक्ति का दिमाग अलग अलग है। सभी को यही इच्छा रहती है कि उसका दिमाग तेज बने। कुछ ऐसे खाद्य पदार्थ हैं

### जटामासी

जिन का सीधा असर दिमाग पर होता है। आप इन्हे कैसे भी प्रयोग कर सकते हैं चाहे खाने के रुप में या सब्जी में मिला कर खाएं। अगर कोई बीमार है तो वह अपने डाक्टर से राय ले लेवें।

आज्ञा चक्र - ४९

- जटामासी

दिमाग को तेज करने के लिये सब से उपयोगी जड़ी बूटी है। इस बूटी पर लगे हुये छोटे-छोटे बाल बहुत महत्वपूर्ण होते हैं। इसे पीस कर एक चमच एक कप गर्म दूध में डाल कर दिन में दो बार लें। ये धीरे धीरे काम करती है। इस से दिमाग तेज होता है।

आज्ञा चक्र -

५० - ब्राह्मी

यह दिमाग के लिये खास टॉनिक है। यह दिमाग को शांत, मजबूत और स्पष्ट बनाती है। आधा चमच ब्राह्मी के पाऊडर को शहद और गर्म पानी में मिला कर उपयोग करें। बच्चों के लिये भी लाभकारी है।

आज्ञा चक्र -५१ - शंख पुष्पी

ये बूटी दिमाग में खून के सर्कुलेशन को बढ़ाती है। इसके सेवन से यादाशत और सीखने की क्षमता बढ़ती है। आधा चम्मच शंखपुष्पी एक कप गर्म पानी में मिला कर लेनी चाहिये ।

आज्ञा चक्र - ५१- दालचीनी

यह रसोई में मसाले के रुप में प्रयोग होती है। परंतु यह दिमाग को शक्तिशाली बनाती है। इस से तनाव कम होता है। रात को सोते समय नियमित रुप से एक चुटकी दालचीनी पाऊडर को शहद के साथ मिला कर लेने से मानसिक तनाव में राहत मिलती है और दिमाग तेज बनता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : सांगा बरे टिव्ही आणि वृत्तपत्र या दोन प्रसार माध्यमांमध्ये काय अंतर आहे?

गण्या : टिव्हीमध्ये आपण पोळ्या गुंडाळू शकत नाही

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ कोणत्या भारतीय महिलेची टाईम मासिकाने वूमन ऑफ द इयर २०२५ मासिकामध्ये निवड केली आहे? - पूर्णिमा देवी बर्मन

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

सरकी तेल, रेपसीड तेल, मोहडा तेल, सालसीड तेल, मोहरी तेल, धुपा तेल, सोयाबीन तेल, भात-तूस तेल, मका तेल, फुलवारा तेल अशा अनेक प्रकारच्या तेलांपासून हे अनैसर्गिक कृत्रिम घनीभूत तूप बनविले जाते. या तेलांमध्ये सायट्रिक ॲसिड घालून तापवितात. नंतर कॉस्टिक सोड्याने त्याला धुऊन त्याचा रंग पांढरा केला जातो. अजून शुभ्रपणा येण्यासाठी आम्लमाती व कोळशाच्या सान्निध्यात पुन्हा तेले तापविली जातात. त्यानंतर ब्लीचिंग करून शुभ्रपणा वाढविला जातो. या प्रक्रियेमुळे तेलांमधील आवश्यक असलेली सर्व नैसर्गिक मूलद्रव्ये नष्ट होतात. या तेलांना घट्टपणा येण्यासाठी यामध्ये हायड्रोजन गॅस सोडतात. या प्रक्रियेसाठी निकेल धातू वापरला जातो, जो आरोग्यास अतिशय घातक असतो. यानंतर कृत्रिम घनीभूत अनैसर्गिक तूप बनते, परंतु याचा वास नष्ट करण्यासाठी पुन्हा रासायनिक प्रक्रिया करून हे तूप ४ ते ५ तासांपर्यंत २४० अंश ते २६० अंश सेंटीग्रेडला तापवले जाते व सर्वांत शेवटी अशा

### प्रक्रिया

पद्धतीने अनैसर्गिक वनस्पती तूप बनते.

गुणधर्म : वरील पद्धतीने अनैसर्गिक वनस्पती तूप बनल्यानंतर त्यातील सर्व पोषक घटक नष्ट होतात व उरते ते फक्त निःसत्त्व घन तूप ! या तुपात कृत्रिम पद्धतीने जीवनसत्त्व सर्वात शेवटी मिसळले जाते. परंतु हे तूप पचनास जड झाल्यामुळे शरीरावर त्याचा अतिरिक्त भार पडतो. पर्यायाने कृत्रिम जीवनसत्त्वांचा काहीही उपयोग होत नाही. हे तूप म्हणजे एकप्रकारे संपृक्त, स्निग्ध पदार्थ की जो सामान्य तापमानावर घन स्वरूपात राहतो. हे तूप सामान्य तापमानामध्ये घन स्वरूपात राहिल्यामुळे सेवन केल्यानंतर शरीरात देखील रक्तवाहिन्यांमध्ये घन स्वरूपात राहते. रक्तवाहिन्यांच्या आतील आवरणाला हे तूप चिकटून राहते. त्यामुळे रक्तपुरवठा सुरळीत राहण्यास अडथळा निर्माण होतो व पर्यायाने उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, हृदयविकार असे आजार जडतात.

या वनस्पती तुपामुळे एलडीएल हे खराब कोलेस्टेरॉल वाढते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका निर्माण होतो. म्हणून वनस्पती तूप आहारातून पूर्णपणे वर्ज्य करायलाच हवे. वनस्पती तुपापासून बनविलेले पदार्थसुद्धा खाऊ नयेत.

उदाहरणार्थ : बिस्किट्स, चॉकलेट्स, नानकटाई, केक, खारी, पाव, ब्रेड हे सर्व पदार्थ आहारातून वर्ज्य करावेत. हे तूप पचनास जड असल्यामुळे व शरीरास आत चिकटून राहत असल्यामुळे आम्लपित्त, अपचन, गॅसेस इत्यादी तक्रारी लगेचच सुरू होतात. उपवासाच्या दिवशी खरेतर सात्त्विक फलाहार घेणे गरजेचे असते. परंतु असे न होता जड वनस्पती तूप वापरून वेफर्स, पापड्या यांचे तळण केले जाते. तसेच याच तुपात साबुदाणा खिचडी, वडे केले जातात. असे खाणे शरीरास अतिशय घातक आहे. यापेक्षा उपवास न केलेलाच बरा! **(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला शिक्षकांना 'आम्ही सावित्रीच्या लेकी' पुरस्काराने सन्मानित करताना मान्यवर.

# महिला शिक्षकांचा 'आम्ही सावित्रीच्या लेकी' पुरस्काराने गौरव

नगर – क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त काका ट्रस्टच्या वतीने महिला शिक्षकांचा गौरव करत 'आम्ही सावित्रीच्या लेकी' पुरस्कार प्रदान करून महिला शिक्षण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. केडगाव येथील सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित या कार्यक्रमात महिला शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत आलेल्या चिमुकल्या मुलींनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी आपल्या सादरीकरणातून 'मुलगी वाचवा, मुलगी शिकवा' हा संदेश दिला.

केडगाव येथील सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील महिला शिक्षकांना गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष ड. सचिन जगताप यांच्या हस्ते 'आम्ही सावित्रीच्या लेकी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे संयोजक शहर बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते, संस्थेचे कार्यवाह सोमनाथ दिघे, अध्यक्ष दादाराव ढवाण, सहकार्यवाह डॉ. रवींद्र चोभे, सहकोषाध्यक्ष डॉ. आर. आर. पवार, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य दादासाहेब काजळे, विवेक गायकवाड, शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक संदीप भोर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणातील क्रांतिकारी कार्याचा आढावा घेतला. महिलांना केवळ 'चूल आणि मूल' या चौकटीत न अडकवता शिक्षणाच्या माध्यमातून जग दाखविण्याचे कार्य सावित्रीबाईंनी केल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनावर भाषणे सादर करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

अ‍ॅड. सचिन जगताप म्हणाले की, शैक्षणिक चळवळीसाठी स्वर्गीय अरुणकाका जगताप यांचे नेहमीच मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्याच संस्कारांचा वारसा पुढे घेऊन आम्ही समाजहितासाठी कार्य करत आहोत. 'गुरुर साक्षात परब्रह्म' व 'या देवी सर्वभूतेषु' या उद्गारांसह त्यांनी महिला शिक्षकांना वंदन केले. सावित्रीबाईंनी विद्येचे महत्त्व ओळखून समाजात परिवर्तनाची मशाल पेटवली. आज महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असून या महिला क्रांतीचा पाया सावित्रीबाई फुले यांनीच स्त्री शिक्षणातून घातला, असे त्यांनी सांगितले.

प्रा. माणिक विधाते म्हणाले, शिक्षण क्षेत्रात विद्या दानाचे महान कार्य आज महिला शिक्षक मोठ्या निष्ठेने करत आहेत. याचे श्रेय सावित्रीबाई फुले यांनाच जाते. दरवर्षी त्यांच्या जयंती दिनी महिला शिक्षकांचा गौरव करण्यात येतो. सावित्रीबाईंनी त्या काळात सहन केलेल्या संघर्षाची जाणीव ठेवून आजच्या महिला शिक्षकांनी पुढील वाटचाल करावी, असे त्यांनी आवाहन केले. तसेच कोरोनानंतर वाढलेल्या मोबाईल संस्कृतीबाबत चिंता व्यक्त करत, मोबाईलचा वापर ज्ञानवृद्धीसाठी करावा, असे आवाहन पालक व विद्यार्थ्यांना केले.

या सन्मान सोहळ्यात मुख्याध्यापिका मोहिनी धर्माधिकारी, शिक्षिका वैशाली घोरपडे, नंदा भोर, अनिता क्षीरसागर, स्मिता खिलारी, अर्चना कुलकर्णी, सुरेखा कजबे, मीना जाधव, सोनाली कुलकर्णी, वैशाली सातपुते, अश्विनी डेंगळे, मनीषा वाळके, कल्याणी नरवडे, शितल थोरात, दीपिका शिंदे, स्मिता भुसारी, सोनाली दारुंटे व कल्याणी चौधरी यांना 'आम्ही सावित्रीच्या लेकी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन्मानार्थ शाल, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले. याप्रसंगी दादासाहेब काजळे यांना पुणे विद्यापीठाकडून पीएचडी मिळाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन स्मिता खिलारी, अर्चना कुलकर्णी यांनी केले, तर सहशिक्षक अविनाश साठे व शिवाजी मगर यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## विटेवरील ग्रंथालय

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलनः दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

ग्रंथ, ग्रंथालय, लेखक आणि वाचक ही वाङ्मयीन नात्याची चतुर्विध गुंफण आहे. एकमेकांशी असणाऱ्या अद्वैत नात्याने ही गुंफण विणली आहे. विचार संक्रमणाचे माध्यम म्हणून भाषा निर्माण झाली. भाषेतून वाङ्मय लिपीचा शोध लागल्यावर हे वाङ्मय लिपीबद्ध होऊ लागले. मग ते भूर्जपत्रासारख्या पानावर लिहिले जाऊ लागले आणि त्यातून ग्रंथांची निर्मिती होऊ लागली. कालिदासाच्या वाङ्मयातही लेखनासाठी कमलपत्रे, भूर्जपत्रे, ताडपत्रे यांचा उपयोग केला गेला असल्याचे संदर्भ आहेत.

इ.स. १५व्या शतकात युरोपमध्ये कागद आणि मुद्रण कलेचा शोध लागला आणि ग्रंथांच्या रूपातील विचारधन सामान्यांपर्यंत जाऊन पोचले. इ.स. १९ व्या शतकात युरोपियन संशोधकांनी प्राचीन संस्कृतीच्या शोधासाठी 'आशीयामायनर' येथे उत्खनन केले. त्यात सनपूर्व सातव्या शतकातील 'आसीरियन राजा असुर अवनी पाल' याच्या राजवाड्यात विटेवरील ग्रंथालय सापडले.

हे ग्रंथालय कसे होते? राजवाड्याच्या भोवती असणाऱ्या इमारतींमध्ये विविध खोल्या होत्या. विट ही ओली असताना तिच्या आठही भागांवर टोकदार दाभणाने अक्षरे व शब्द कोरलेले असायचे. अशा एकावर एक विटा रचून संपूर्ण खोलीभर विटांमध्ये एक ग्रंथ सामावलेला असायचा. अशा अनेक खोल्यांमधून ते विटेवरील ग्रंथ ठेवलेले होते.

ज्ञान आणि विट याचा खूप जुना संबंध आहे. आपण पंढरीच्या पांडुरंगाला ज्ञानमूर्ती म्हणतो. ती ज्ञानमूर्ती विटेवर उभी आहे. तिथे ज्ञान विटेवर कोरले गेले तर इथे ज्ञान विटेवर उभे राहिले. भारतीय परंपरेत ग्रंथांची आणि वाचनाची आवड खूप प्राचीन आहे. एखाद्या मोठ्या ग्रंथाचे हस्तलिखित उपलब्ध व्हायचे आणि गावागावातून श्रावणात किंवा अधिक मासात तो ग्रंथ ऐकवला जायचा. त्या ग्रंथावर गावकरी त्यांच्या त्यांच्या आकलनाप्रमाणे चर्चा करायचे. पुढे ग्रंथालय आले आणि सरस्वतीचे द्वार मुक्त झाले. ज्ञानदेवांच्या भाषेत सांगायचे तर

हे लावण्यरत्न भांडार । शारदेचे ।

ग्रंथालय हे शारदेचे लावण्यरत्न भांडार आहे. पुष्कळवेळा वाचकाने लेखक पाहिलेला नसतो. ग्रंथालयात दृश्य वाचकाला अदृश्य लेखक भेटतात आणि आणि ग्रंथांवर तसेच लेखकांवर प्रेम करणाऱ्या अज्ञाताच्या अनुभूतीचे प्रकटीकरण होते. ग्रंथालय हे ग्रंथ आणि वाङ्मयांचे माहेर आहे. तिथेच ते आनंदाने विसावतात पण येणाऱ्या वाचकांची वाट पाहत.

– किशोर गांधी

# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत प्रा.मधुसूदन मुळे



नगर – जिल्ह्यात शैक्षणिक संस्थांमध्ये नावाजलेल्या हिंदूसेवा मंडळाचे माजी अध्यक्ष, श्रीराम जन्मभूमीसाठी कारसेवक म्हणून भाग घेणारे व श्री याज्ञवल्क्य नागरी सहकारी पतसंस्थेचे विद्यमान ज्येष्ठ संचालक प्रा. मधुसूदन गजानन मुळे यांची अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदभाई कुलकर्णी यांनी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत निवड केली आहे.

प्रा. मुळे यांनी आजपर्यंत विविध क्षेत्रात विविध पदांवर काम केलेले आहे. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशा विविध स्तरावर त्यांनी भरीव कार्य केलेले आहे. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ महाराष्ट्र प्रदेशचे सरचिटणीस म्हणून अनेक वर्षापासून ते कार्यरत आहेत. ब्राह्मण विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. सुयोग ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष व विद्यमान सचिव म्हणून कार्यरत आहेत.

सहस्त्रचंद्रदर्शन झाल्यानंतरही आजही या वयात तरुण पिढीला मागे टाकतील इतक्या हिरहिरीने सर्व क्षेत्रात कार्यात सहभागी असतात व अशा व्यक्तिमत्वाची राष्ट्रीय कार्यकारिणीत निवड होणे ही अभिमानाची बाब आहे. असे उद्गार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखील लातूरकर यांनी काढले आहे.

# अहिल्यानगरमध्ये रंगली राज्यस्तरीय शालेय सायकलिंग रोड रेस



अहिल्यानगरमध्ये आयोजित राज्यस्तरीय शालेय सायकलिंग रोड रेस स्पर्धेत सहभागी स्पर्धक.

नगर – जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर व सायकलिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली राज्यस्तरीय शालेय सायकलिंग रोड रेस क्रीडा स्पर्धा चांदबीबी महाल, वाळुंज बायपास येथे अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. सकाळी कडाक्याच्या थंडीत सायकलपटूंनी आपल्या वेग, सहनशक्ती व फिटनेसचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

थंडीच्या आल्हाददायक वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेत मुला–मुलींच्या १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील १२ इव्हेंट घेण्यात आले. ५, १० व २० किलोमीटरच्या विविध गटात झालेल्या शर्यतींमुळे संपूर्ण रस्ता सायकलपटूंनी गजबजून गेला होता. महाराष्ट्रातील सहा विभागातून २४० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या हस्ते सायकल रेसला झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, क्रीडा अधिकारी प्रवीण कोंढावळे, विशाल गर्जे, क्रीडा प्रबोधिनीच्या प्राचार्या दिपाली पाटील, प्रा. साईनाथ थोरात, महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे खजिनदार भिकन अंबे, दिपाली शिलडनकर, रावसाहेब बाबर, सायकलिंग असोसिएशनचे सचिव प्रा. संजय साठे, आरती माने, संजय शिंदे, संभाजी मोहिते, स्वप्निल माने, सागर कोळपकर, शैलेश गवळी, प्रायोजक अविनाश सातपुते, एकलव्य पुरस्कार विजेते सचिन सातपुते, उद्योजक ईश्वर बेरड आदी मान्यवरांसह खेळाडू, प्रशिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्ह्यात विविध खेळांच्या १३ राज्यस्तरीय स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रावसाहेब बाबर यांनी केले. प्रा. संजय साठे यांनी भारताच्या सायकलिंग संघात १८ ते १९ खेळाडू महाराष्ट्रातील असल्याची माहिती दिली. नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत महाराष्ट्र संघाने जनरल चॅम्पियनशिप पटकावल्याचे त्यांनी नमूद करत सर्वांचे आभार मानले. सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच घार्गे यांनी सायकल चालविण्याचा देखील आनंद घेतला. विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय सायकलिंग रोड रेस स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

# अयोध्याप्रमाणे नगरमध्ये श्रीराम लल्ला प्रतिष्ठा द्वादशी उत्सव साजरा



अयोध्याप्रमाणे नगरमध्ये श्रीराम लल्ला प्रतिष्ठा द्वादशी उत्सव साजरा करण्यात आला, त्यात सहभागी झालेले भाविक.

नगर – अयोध्येतील प्रभू श्रीराम लल्ला प्राणप्रतिष्ठेच्या तिथीनुसार श्रीराम लल्ला प्रतिष्ठा द्वादशी यावर्षी ३१ डिसेंबर २०२५ रोजी अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती भागातील नवी पेठ येथील पुरातन श्रीराम मंदिरात अयोध्याप्रमाणेच मोठ्या उत्साहात, भक्तिभावात व धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट, यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले २० ते ३१ डिसेंबरदरम्यानचे ११ दिवसीय धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

या निमित्ताने मंदिर परिसरात आकर्षक बंगाली मंडप, विद्युत रोषणाई, फुलांची सजावट करण्यात आली होती. संपूर्ण नवी पेठ परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. या उत्सवाची सुरुवात २० डिसेंबर रोजी सकाळी श्रीराम जय राम जय जय राम या अखंड संगीतमय नामजपाने करण्यात आली. तब्बल १२ हजारांहून अधिक भाविकांनी या नामजपात सहभाग घेतला.

२१ डिसेंबर रोजी नगर शहरातून ढोल–ताशांच्या गजरात, टाळ–मृदुंगाच्या निनादात भव्य ग्रंथ व कलश शोभायात्रा काढण्यात आली. यानंतर श्रीराम मंदिर, नवी पेठ येथे परमपूज्य रामायणाचार्य गोरक्षनाथ महाराज यांच्या सुमधुर व प्रभावी वाणीतून ११ दिवसीय श्रीरामचरितमानस कथेला विधिवत प्रारंभ झाला. २१ ते २९ डिसेंबरदरम्यान दररोज रात्री कथा, आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

३० डिसेंबर रोजी पं. गिरीराजजी व्यास यांच्या सुमधुर वाणीतून संगीतमय सुंदरकांड संपन्न झाले. ३१ डिसेंबर रोजी प्रतिष्ठा द्वादशीच्या मुख्य दिवशी पहाटे प्रभू श्रीराम लल्लांचा जलाभिषेक व दुग्धाभिषेक, मंगल आरती, शृंगार दर्शन, तसेच 'एक सुबह प्रभू श्रीराम के नाम' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अयोध्येत ज्या वेळी प्रभू श्रीराम लल्लांची आरती झाली, त्याच वेळी श्रीराम मंदिर नवी पेठ येथेही महाआरती करण्यात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले होते.

श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष प्रीतम मुथा यांनी सांगितले की, प्रभू श्रीरामांचे चरित्र प्रत्येकाच्या जीवनात उतरावे आणि तरुण पिढीत संस्कार रुजावेत, हा या उत्सवामागील मुख्य उद्देश आहे. उपाध्यक्ष श्री निखिल शेटीया यांनी नगरकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त करत, असे धार्मिक उपक्रम समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले.

नवी पेठेतील सुमारे तीनशे वर्षांहून अधिक प्राचीन असलेले श्रीराम मंदिर हे शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे एक महत्त्वाचे केंद्र असून, या प्रतिष्ठा द्वादशी उत्सवामुळे नगरकरांना एक अविस्मरणीय आध्यात्मिक अनुभव लाभला. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, सेवेकरी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.



आंतरशालेय क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळविणाऱ्या डॉ. पी.ए. इनामदार विद्यालयाच्या विद्यार्थिनी.

# आंतरशालेय क्रीडा स्पर्धेमध्ये डॉ.पी.ए. इनामदार विद्यालयाचे यश

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे आयोजित आंतरशालेय क्रीडा स्पर्धेमध्ये गुरुकुल कॅम्पसमधील डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभाग घेऊन २०० मी धावणे स्पर्धेमध्ये कु. अलिना इरफान शेख या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक पटकाविला.

त्याचप्रमाणे सांघिक रिले या खेळामध्ये कु. तेजस्विनी कैलास जाधव, कु. मुस्कान सुदिन मन्सुरी, कु. कल्याणी अंकुश साबळे, कु. अलिना इरफान शेख या सांघिक कामगिरीने तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत ४० हून अधिक शाळांनी सहभाग नोंदवला होता.

विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष एन.ए. पठाण, चेअरमन अनिल साळुंके, सचिव समीर पठाण, शाला समिती सदस्य लक्ष्मीकांत गरड, देविदास डहाळे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सदर विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षक निमसे अमोल, गवारे अभिजीत, कडूस शितल, भिंगारदिवे किरण आदींचे मार्गदर्शन लाभले.

## कर्ज योजनेतील २५८ अर्जदारांनी तात्काळ संपर्क साधावा

नगर – महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या सफाई कर्मचारी योजनेंतर्गत आलेल्या २५८ कर्ज प्रस्तावांची पुढील कार्यवाही प्रलंबित आहे. संबंधित अर्जदारांनी येत्या सात दिवसांत मूळ कागदपत्रांसह कार्यालयाशी संपर्क साधावा, अन्यथा हे प्रस्ताव रद्द होऊ शकतात, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

महामंडळाकडे सन २०२३ मध्ये या योजनेंतर्गत २५८ अर्जदारांनी ऑनलाईन प्रस्ताव दाखल केले होते. मात्र, अद्याप या प्रस्तावांसोबत आवश्यक ती मूळ कागदपत्रे सादर झालेली नाहीत. त्यामुळे योजनेचा लाभ मिळण्यासाठी आणि प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

अर्जदारांनी विहित मुदतीत महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधून कागदपत्रे जमा करावीत, जेणेकरून त्यांचे कर्ज प्रस्ताव मार्गी लावता येतील. संपर्क न केल्यास कर्जाची आवश्यकता नाही असे समजून पुढील कार्यवाही केली जाईल, असेही महामंडळाकडून कळविण्यात आले आहे.

# शहरस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण



शहरस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करताना मान्यवर.

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभाग, अनुदानित मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळा व अहिल्यानगर महानगरपालिका शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू आर्टस् कॉलेजच्या मैदानावर आयोजित शहरातील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या क्रिडा स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न झाले.

पारितोषिक वितरण समारंभासाठी अहिल्यानगर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनिल पंडित, महासंघाचे मार्गदर्शक का.र.तुंगार, प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, महासंघाचे राज्य सचिव विठ्ठल उरमुडे, मनपा शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस अरुण पवार,मनपा शिक्षक संघ अध्यक्षा मनिषा शिंदे, राज्य संघटक भाऊसाहेब कबाडी, महासंघाचे जिल्हा कार्याध्यक्ष अन्सार शेख, मुख्याध्यापिका अर्चना गिरी, कल्पना भामरे, महासंघाचे जिल्हा सचिव शेखर उंडे उपस्थित होते. दोन दिवसीय या क्रीडा स्पर्धेमध्ये शहरातील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

**स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे –** धावणे स्पर्धा (१ ली व २ री मुले) आशिष ठोंबे (प्रथम), विराट ससे (द्वितीय), कैलास जाधव (तृतीय) धावणे स्पर्धा (१ ली व २ री मुली) शुभ्रा लोखंडे (प्रथम), काजल देवकर (द्वितीय), सान्वी होले (तृतीय), धावणे स्पर्धा (३री व ४ थी मुली) सौम्यता भिंगारदिवे (प्रथम), यशश्री कांबळे (द्वितीय), निहारिका थोरात (तृतीय) धावणे स्पर्धा (३ री व४ थी मुले) योगेश पवार (प्रथम), कार्तिक जाधव (द्वितीय), हार्दिक वाघमारे (तृतीय) धावणे स्पर्धा (५ वी ते ७ वी मुले) वेदांत वैरागर (प्रथम), साई गायकवाड (द्वितीय), गौरव म्हस्के (तृतीय) धावणे स्पर्धा (५ वी ते ७ वी मुली) प्रिया गव्हाणे (प्रथम), शेख अलिना(द्वितीय), भक्ती पालवे (तृतीय) लंगडधाव (३ री व ४ थी मुले) प्रथमेश भुसारी (प्रथम), श्रीनिवास विटवेकर (द्वितीय), कुंज जाधव (तृतीय) लंगडधाव (३ री व ४ थी मुली) अनुष्का झिरपे (प्रथम), धनश्री फुलारे (द्वितीय), शिवन्या चव्हाण (तृतीय) रिले स्पर्धा (३ री व ४ थी मुले) रेणावीकर विद्यामंदिर (प्रथम), दुर्गादेवी नय्यर विद्यामंदिर (द्वितीय), पंचशील विद्यामंदिर (तृतीय) रिले स्पर्धा (३ री व ४ थी मुली) रेणावीकर विद्यामंदिर (प्रथम), दुर्गादेवी नय्यर विद्यामंदिर (द्वितीय), दामोदर विधाते विद्यालय (तृतीय) रिले स्पर्धा (५ वी ते ७ वी मुले) रेणावीकर विद्यामंदिर (प्रथम), दुर्गादेवी नय्यर विद्यामंदिर (द्वितीय), चक्रधर स्वामी विद्यालय (तृतीय) रिले स्पर्धा (५ वी ते ७ वी मुली) दुर्गादेवी नय्यर विद्यामंदिर (प्रथम), रेणावीकर विद्यामंदिर (द्वितीय),पी.ए.इनामदार विद्यालय (तृतीय) लंगडी स्पर्धा (३ री व४ थी मुले) रेणावीकर विद्यामंदिर (प्रथम), दुर्गादेवी नय्यर विद्यामंदिर (द्वितीय), हिंदसेवा मंडळ प्राथ. शाळा बागडपट्टी (तृतीय) लंगडी स्पर्धा (३ री व ४ थी मुली) रेणावीकर विद्यालय (प्रथम), दामोदर विधाते विद्यालय (द्वितीय), दुर्गादेवी नय्यर विद्यामंदिर (तृतीय) कबड्डी स्पर्धा (५ वी ते ७ वी मुले) सरस्वती विद्यामंदिर (प्रथम), दामोदर विधाते विद्यालय (द्वितीय), चक्रधर स्वामी विद्यालय (तृतीय) कबड्डी स्पर्धा (५ वी ते ७ वी मुली) सरस्वती विद्यामंदिर (प्रथम) राघवेंद्र स्वामी विद्यालय (द्वितीय), समर्थ विद्यामंदिर सांगळे गल्ली (तृतीय) खो खो स्पर्धा (५ वी ते ७ वी मुले) चक्रधर स्वामी विद्यालय (प्रथम), दुर्गादेवी नय्यर विद्यामंदिर (द्वितीय), मार्कंडेय प्राथ. विद्यालय श्रमिकनगर (तृतीय) खो खो स्पर्धा (५ वी ते ७ वी मुली) दुर्गादेवी नय्यर विद्यामंदिर (प्रथम), रेणावीकर विद्यामंदिर (द्वितीय), संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशाला (तृतीय)

स्पर्धा यशस्वीतेसाठी विठ्ठल उरमुडे, अरुण पवार, शेखर उंडे,भाऊसाहेब कबाडी, मनिषा शिंदे,अतुल सारसर, नंदकुमार हंबर्डे, वैभव वाघ, स्मिता उकिरडे, वैशाली मगर,लक्ष्मण माने, शौकत शेख, संजय चौरे, सुमेध मेढे, अमोल शिंदे,अवि साठे, अर्चना गिरी,विद्या दगडे,कल्पना भामरे, दिप्ती दरेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी केले तर स्वागत विठ्ठल उरमुडे यांनी केले.

सुत्रसंचलन अरुण पवार यांनी केले. शेखर उंडे यांनी आभार मानले.

# केडगावमध्ये पुस्तकांच्या गुढीने क्रांतीज्योती सावित्रीबाईंना अभिवादन

## सावित्री उत्सवात महिलांच्या हस्ते साने गुरुजी वाचनालयाचे उद्‌घाटन


केडगावमध्ये पुस्तकांची गुढी उभारत क्रांतीज्योती सावित्रीबाईंना अभिवादन करताना शिवाजी नाईकवाडी व परिवार.

नगर – माणुसकीचे दुत व राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते शिवाजी नाईकवाडी यांच्या परिवाराने सालाबाद प्रमाणे सावित्रीबाई यांच्या जयंतीच्या दिवशी पुस्तकांची गुढी उभारून वाचाल तर वाचाल हा संदेश देण्यासाठी जो संकल्प केलेला आहे तो स्तुत्य असा उपक्रम आहे. यावर्षी सावित्री उत्सवात उपस्थित महिलांचे हस्ते साने गुरूजी वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले.

केडगाव परिसरात हा उपक्रम राबविल्याबद्दल व त्या उपक्रमास एवढा मोठा प्रतिसाद मिळाला याचे खरोखर आत्मिक समाधान लाभले. नाईकवाडी मामा व त्यांचा परिवार नेहमीच सामाजिक उपक्रम राबवित असतात. पुस्तकांची गुढी उभारण्याचे त्यांचे हे बारावे वर्ष आहे. त्यांनी समाजाला एक नवीन आदर्श निर्माण करून दिलेला आहे. असे प्रतिपादन प्रा.उमादेवी राऊत यांनी केले.याप्रसंगी त्यांनी व सविता रणसिंग यांनी सावित्रीबाई यांची गीते गायली.

माणुसकीचे दुत शिवाजी नाईकवाडी हे शाळा महाविद्यालयात विविध विषयांवर कार्यशाळा घेतात. त्यांनी त्यांच्या केडगाव येथील राहत्या घरी पुस्तकांची साडे सात फुटी गुढी उभारली आहे. खरंतर हा नवीनतम उपक्रम सर्वांनी राबवायला हवा. असे राष्ट्र सेवा दलाचे माजी कार्याध्यक्ष विवेक पवार यांनी म्हटले.संस्कार शिबिराच्या माध्यमातून मुला–मुलींना संस्कार देण्याचे कार्य त्यांचे प्रशंसनीय आहे,तसेच सर्वांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांच्याकडे असलेल्या वाचनालयातील पुस्तकांचा आपण लाभ घ्यायला हवा. असे स्वामी समर्थ केंद्राचे प्रवक्ते श्री. संजय पर्वत यांनी सांगितले.

वाचाल तरच जीवनात वाचाल या प्रमुख उद्देशाने या पुस्तकांच्या गुढीचा संकल्प केलेला आहे, राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून मामांनी संस्कारक्षम गोष्टी देण्याचा ध्यास घेतलेला आहे. मामींची व सुनबाई, मुलगा सागर आणि नातवांची त्यांना खंबीर साथ आहे असे राष्ट्र सेवा दलाचे माजी जिल्हा कार्याध्यक्ष भीमराज कोडम यांनी सांगितले.

एकूण पंधराशेच्या वर पुस्तकांचा समावेश या गुढीसाठी केलेला होता. मनीषा जाधव यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची हुबेहूब रांगोळीतून प्रतिमा साकारलेली होती. त्या कलेची सर्वांनी प्रशंसा केली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस वंदन करून सालाबाद प्रमाणे आईच्या स्मृती प्रित्यर्थ मान्यवर महिलांच्या हस्ते ज्ञानज्योती लावण्यात आल्या. आमच्या परिसरात इतका चांगला उपक्रम नाईकवाडी परिवाराने राबविला व त्यामध्ये आम्हा सर्व महिलांना सहभागी करून घेतले. याचा आम्हाला अभिमान वाटतो असे उपस्थित महिलांनी सांगितले. सावित्री उत्सवामध्ये सावित्री वदते या विषयावरील पोस्टर्स लावण्यात आली होती.

सावित्री उत्सवानिमित्त क्रांतीज्योती सावित्रीबाई यांची कार्य कर्तुत्वाची माहिती शिवाजी नाईकवाडी यांनी सांगून सामुदायिक सावित्रीची ओवी घेण्यात आली. विवेक पवार यांनी प्रश्न विचारून कार्यक्रमात रंगत आणली.

पुस्तक मित्र योजना अंतर्गत साने गुरुजी वाचनालयासाठी पाच हजार पुस्तके जमविण्याचा संकल्प करण्यात आला होता त्याप्रमाणे एक हजार पुस्तके मित्रांनी दिली. सध्या अडीच हजार पुस्तके जमा आहेत आज सावित्री उत्सवानिमित्त साने गुरुजी वाचनालयाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे साऊ यांच्या जयंतीच्या दिवशी उपस्थित सर्व महिलांना शिवाजी नाईकवाडी यांच्या पत्नी उषाताई व सुनबाई अश्विनी नाईकवाडी यांनी हळदी कुंकू लावून परिवर्तनाची गीतावली ही पुस्तिका सस्नेह भेट दिली.

शांतिनिकेतन फार्मसी कॉलेजच्या होस्टेलवर राहणाऱ्या ५० मुली या कार्यक्रमास उपस्थित होत्या त्यांच्यापैकी काहींनी कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभाग घेऊन मदतच केली .त्यानंतर सर्वांना अल्पोपहार देण्यात आला. उपस्थित सर्व महिलांच्या व मुलींच्या हाती ज्ञानाची ज्योत लावून सावित्रीबाईंना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी परिसरातील बहुसंख्य महिलावर्ग उपस्थित होता. पुस्तकाची गुढी उभारण्यासाठी नाईकवाडी यांचे नातू शौर्य व आर्य यांनी खूप सहकार्य केले. याप्रसंगी बऱ्याच जणांनी अशा प्रकारची गुढी उभारण्याचा संकल्प सोडला. हेच या उपक्रमाचे फलित ठरले.


सारडा महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी 'हिस्ट्रॉरिक डे' प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आदर्श व ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या.

# सारडा महाविद्यालयामध्ये अवतरल्या सावित्रीबाई फुले, जिजामाता व भगतसिंग

नगर – क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सारडा महाविद्यालयात सुरू असलेल्या स्नेहसंमेलना निमित्ताने 'हिस्ट्रॉरिक डे' साजरा करण्यात आला. या उपक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी विविध आदर्श व ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अनेक महिला प्राध्यापकांनीही सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली होती. तसेच विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ, महाराणी येसूबाई व मदर तेरेसा, तर विद्यार्थ्यांनी भगतसिंग व सरदार वल्लभभाई पटेल यांची वेशभूषा साकारली होती. या अनोख्या व प्रेरणादायी उपक्रमामुळे सारडा महाविद्यालयातील वातावरण इतिहासप्रेमी व उत्साही झाले होते.

यावेळी प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या मुळेच आज महिला व मुली स्वाभिमानाने शिक्षणासह सर्व क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत आहेत. त्यांच्या कार्य व विचारांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी प्रगती करावी, असे आवाहन करून हिस्ट्रॉरिक डे निमित्त प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी साकारलेल्या ऐतिहासिक व आदर्श व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषेमुळे सारडा महाविद्यालयात वेगळे उत्साहपूर्ण वातवरण निर्माण झाले असल्याचे सांगून सर्वांचे अभिनंदन केले.

स्नेहसंमेलनाच्या कार्याध्यक्षा प्रा.अपर्णा शेपाळ, उपप्राचार्य गिरीश पाखरे, प्रबंधक अशोक असेरी, पार्यवेक्षक महेश कुलकर्णी यांच्या हस्ते ऐतिहासिक व्यक्तींची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा.ज्योती बीडलन यांनी केले. प्रा.शैलेश देशमुख यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा.कृष्णा पाटील यांनी आभार मानले. यावेळी सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# भारतीय जनता पार्टीच्या अहिल्यानगर चिटणीसपदी कुणाल भंडारी यांची निवड


भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते कुणाल भंडारी यांना अहिल्यानगर शहर चिटणीस पदी नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

नगर – मुंबई येथे भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते कुणाल भंडारी यांना अहिल्यानगर शहर चिटणीस पदी नियुक्तीचे पत्र देण्यात आले. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, अशोक गायकवाड, रवी नामदे, विवेक नाईक आदी उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षापासून कुणाल भंडारी यांनी पक्षासाठी संघटनात्मक काम करीत असून संघटन बांधण्याचे कार्य केलेले आहे. समाजातील वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण महत्त्वाचे योगदान देत आहेत.

कुणाल भंडारी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वस्ती प्रमुख धर्म जागरण बेटी बचाव जिल्हा प्रमुख, बजरंग दल शहर संयोजक, जिल्हा संयोजक, बागेश्वर धाम प्रदेश उपाध्यक्ष अशी पदे भूषवली आहेत.



राष्ट्रीय स्तरावरील जिम ट्रेनर परिक्षेमध्ये यशस्वी झाल्याबद्दल व्यायामपटू वेदकुमार कुलकर्णी यांचा सत्कार करताना सावेडी जॉगींग ट्रॅक येथील व्यायाम प्रेमी, सुप्रभात ग्रुप व वकील संघटनेचे सदस्य. शेजारील छायाचित्रात मार्गदर्शक शशिकांत खिस्ती, सनी वाकोडे यांच्या समवेत वेदकुमार कुलकर्णी.

# राष्ट्रीय स्तरावरील जिम ट्रेनर परिक्षेमध्ये यशस्वी झाल्याबद्दल वेदकुमार कुलकर्णी यांचा गौरव

नगर – नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील जिम ट्रेनर परिक्षेमध्ये यशस्वी झाल्याबद्दल व्यायामपटू वेदकुमार कुलकर्णी यांचा जॉगींग ट्रॅक येथील व्यायाम प्रेमी, सुप्रभात ग्रुप व वकील संघटनेचे सदस्य यांनी सत्कार केला.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक, कोच शशिकांत खिस्ती, वकील संघटनेचे पदाधिकारी ॲड. महेश देवणे, ॲड. अमित पाटील, ॲड. सतीश गुगळे, श्री. भोसले, श्री. दरेकर, सनी वाकोडे, ॲड. विकास सांगळे, सुजित सानप, ॲड. संदिप मुळे सरकारी वकील विनायक दारुणकर, ॲड. मुजीब सय्यद, दीपक विजन आदी उपस्थित होते. वेदकुमार कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात व्यायामाच्या विविध पद्धती व जीवनात व्यायामाचे असलेले महत्त्व विशद केले. सुजित सानप यांनी आभार मानले.


छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेवर राजेंद्र ढाळे व ज्ञानेश्वर शिंदे यांची तज्ञ संचालकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना संचालक मंडळ.

# छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेवर राजेंद्र ढाळे व ज्ञानेश्वर शिंदे यांची तज्ञ संचालकपदी निवड

नगर – छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्था, अहिल्यानगर यांच्या तज्ञ संचालक पदी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री. राजेंद्र ढाळे (पाथर्डी) व आदर्श ग्रामपंचायत अधिकारी श्री. ज्ञानेश्वर उर्फ माऊली शिंदे (नेवासा) यांची बहुमताने निवड करण्यात आली.

नुकत्याच झालेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणुकीत राज्य कोषाध्यक्ष श्री. कुंडलिक भगत व जिल्हाध्यक्ष श्री. किशोर जेजुरकर यांच्या नेतृत्वाखाली सत्ता परिवर्तन घडून आले. त्यानंतर पार पडलेल्या संचालक मंडळाच्या सभेत वरील दोन्ही मान्यवरांची तज्ञ संचालक पदी निवड करण्यात आली.

या निवडीमुळे पाथर्डी व नेवासा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे श्री. ढाळे व श्री. शिंदे यांची निवड करून या तालुक्याला योग्य न्याय दिल्याची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात सुरू आहे. सन २०२२ मध्ये झालेल्या निवडणुकीत पाथर्डी व नेवासा तालुक्याने महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघाच्या समविचारी पॅनलच्या पाठीशी ठामपणे उभे राहत सत्ता स्थापन करण्यात मोलाचा वाटा उचलला होता. त्या योगदानाची ही पावती असल्याचे मत जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

या प्रक्रियेत संस्थेचे नवनिर्वाचित चेअरमन श्री. प्रताप साबळे व व्हाईस चेअरमन श्री. हरीश भालेराव यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली.

निवडीनंतर बोलताना तज्ञ संचालक श्री. राजेंद्र ढाळे व श्री. ज्ञानेश्वर शिंदे यांनी सांगितले की, संचालक मंडळाने आमच्यावर दाखविलेला विश्वास आम्ही निश्चितपणे सार्थ ठरवू. पाथर्डी व नेवासा तालुक्यातून संस्थेस अधिकाधिक ठेवी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करू, तसेच सभासदांच्या हिताचे निर्णय सर्वांना विश्वासात घेऊन संचालक मंडळाच्या सभेत मांडू. यावेळी त्यांनी निवडीबद्दल सर्वांचे आभार मानले.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघाचे सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी तसेच संस्थेचे चेअरमन प्रताप साबळे, व्हा. चेअरमन हरीश भालेराव, मानद सचिव गोटीराम मडके, माजी चेअरमन सदानंद डोखे, संचालक श्रीकांत साळे, सुरेखा लांडगे/गांगर्डे, संगीता परोडकर, सुधाकर पगारे, सुधीर उंडे, संतोष साबळे, राज्य कोषाध्यक्ष कुंडलिक भगत, जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर, जिल्हा सरचिटणीस पोपटराव रासकर, कार्याध्यक्ष सुनील काळे, उपाध्यक्ष उपेंद्र पोटे, देवेंद्र वारुळे,राहुल गांगर्डे, कोषाध्यक्ष अनिल लवांडे, जिल्हा संघटक प्रशांत कदम, बाजीराव पवार, सतीश राठोड,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संदीप थोरात, स्वप्निल आंबेडकर, बाळासाहेब अडसूळ, निलेश माने, तालुकाध्यक्ष प्रभाकर चव्हाण, राजेंद्र बागले, रोहिदास कापरे, तालुका सचिव सखाहरी थोरात, बाबासाहेब भोसले, तालुका उपाध्यक्ष कैलास अकोलकर, ज्येष्ठ मार्गदर्शक रावसाहेब अभंग आदी संघटना पदाधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यानगर पोलीस दलाची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत बाजी

## सय्यद अन्वर अली अन् अर्चना काळे यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले अहिल्यानगर पोलीस दलातील सय्यद अन्वर अली व अर्चना काळे यांचा सत्कार करताना पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे.

नगर – पिंपरी–चिंचवड येथील ज्ञानेंद्र स्टेडियमच्या मैदानावर नुकत्याच संपन्न झालेल्या 'मास्टर्स गेम्स असोसिएशन' आयोजित राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या खेळाडूंनी निर्विवाद वर्चस्व गाजवले आहे. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सय्यद अन्वर अली आणि पोलीस हवालदार अर्चना काळे यांनी या स्पर्धेत तिहेरी विजेतेपद पटकावत राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यभरातून असंख्य खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये सय्यद अन्वर अली यांनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करत लांब उडी आणि १०० मीटर अडथळा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. तसेच १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत त्यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

दुसरीकडे, पोलीस हवालदार अर्चना काळे यांनी महिलांच्या गटात आपली गती सिद्ध करत १०० मीटर, २०० मीटर आणि ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदकांची हॅट्ट्रिक केली. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे दोघांचीही पुढील महिन्यात नाशिक येथे होणाऱ्या राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या विजयी खेळाडूंचा गौरव पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि पोलीस अप्पर पोलिस अधिक्षक वैभव कलुबर्मे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना पोलीस अधीक्षकांनी खेळाडूंच्या जिद्दीचे कौतुक केले आणि राष्ट्रीय स्तरावर यश मिळवण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना पोलीस निरीक्षक उमेश परदेशी (रा.), पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले, पोलीस प्रशिक्षक वर्ग आणि मातोश्री क्लिनिकचे डॉ. खराडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.


पेमराज सारडा महाविद्यालयात स्नेहसंमेलनानिमित्त साडी व टाय डे चे आयोजन करण्यात आले होते.

# सारडा महाविद्यालयात साडी व टाय डे साजरा

नगर – हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात स्नेहसंमेलनानिमित्त साडी व टाय डे चे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विद्यार्थिनींनी विविध प्रकारच्या साड्या परिधान केल्या तर विद्यार्थ्यांनी टाय डे साजरा केला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या भारतीय संस्कृतीची प्रतीक साडी व पाश्चिमात्य संस्कृतीचा टाय यांचा सुरेख संगम या निमित्ताने पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी नाविन्याची कास धरताना आपल्या परंपरांची आठवण ठेवणे आवश्यक आहे.

महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी देखील यात सहभाग नोंदविला.

हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर, कनिष्ठ महाविद्यालय कमिटी चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.मिलिंद देशपांडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरीष पाखरे, प्रबंधक अशोक असेरी, स्नेहसंमेलनाचे कार्याध्यक्ष प्रा.अपर्णा शेपाळ, पर्यवेक्षक डॉ. राजू रिक्कल, डॉ. सुजित कुमावत, प्रा. महेश कुलकर्णी यांसह प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे

## प्रा. मेधाताई काळे यांचे प्रतिपादन; जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी


जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या वतीने क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना पतसंस्थेचे उपाध्यक्ष बाळकृष्ण काळे, प्रा. मेधाताई काळे, संचालक ज्ञानदेव पांडुळे, लक्ष्मणराव सोनाळे, प्रा. किसनराव पायमोडे, उदय अनभुले, द्वारकाधीश राजेभोसले, ॲड. राजेश कावरे, करुणा काळे, अशोक वारकड, अनुपमा भापकर, पुष्पा इंगळे, प्रशांत बोरुडे, सार्थक पवने आदी.

नगर – अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या वतीने थोर समाजसुधारिका, शिक्षणक्रांतीच्या जननी क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती–निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी समाजप्रबोधनपर वातावरणात कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे उपाध्यक्ष बाळकृष्ण काळे हे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून अंबिका महिला बँकेच्या संस्थापिका प्रा. मेधाताई काळे उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आणि विचारांचा समाजाच्या जडणघडणीत असलेला मोलाचा वाटा अधोरेखित केला.

कार्यक्रमात बोलताना प्रा. मेधाताई काळे म्हणाल्या की, क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा दिवा पेटवून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमतेविरुद्ध लढा दिला. त्या केवळ स्त्रियांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणास्थान आहेत. आज महिलांनी शिक्षण, उद्योग, बँकिंग आणि सामाजिक क्षेत्रात जे यश मिळवले आहे, त्यामागे सावित्रीबाईंच्या विचारांचीच शक्ती आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी सहन केलेले अपमान, संघर्ष आणि त्याग आजच्या पिढीने समजून घेणे गरजेचे आहे. स्त्रीने स्वावलंबी व्हावे, आत्मसन्मानाने उभे राहावे आणि समाजपरिवर्तनात सक्रिय भूमिका घ्यावी, हाच त्यांच्या विचारांचा खरा संदेश आहे. प्रत्येक संस्थेने आणि प्रत्येक व्यक्तीने सावित्रीबाईंचे विचार आचरणात आणले तर खऱ्या अर्थाने सामाजिक प्रगती साध्य होईल. यावेळी करुणा काळे, ज्ञानदेव पांडुळे, प्रा. सखाराम पायमोडे यांनी मनोगत व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. आभार उदय अनभुले यांनी मानले.

कार्यक्रमास पतसंस्थेचे संचालक ज्ञानदेव पांडुळे, लक्ष्मणराव सोनाळे, प्रा. किसनराव पायमोडे, उदय अनभुले, द्वारकाधीश राजेभोसले, ॲड. राजेश कावरे, अंबिका महिला बँकेच्या व्यवस्थापकीय संचालिका व जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा उपाध्यक्षा करुणा काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, शाखाधिकारी अनुपमा भापकर, पुष्पा इंगळे, प्रशांत बोरुडे, सार्थक पवने आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे स्मरण करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

# अर्थजगत

नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच शेअर बाजारात गुंतवणुकीच्या नवनव्या संधी शोधणाऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. देशांतर्गत आघाडीची ब्रोकरेज संस्था 'ॲक्सिस सिक्युरिटीज'ने २०२६ या वर्षासाठी आपले पाच प्रमुख 'टॉप पिक्स' जाहीर केले आहेत. जागतिक स्तरावर आर्थिक अस्थिरता असतानाही भारतीय अर्थव्यवस्था भक्कम स्थितीत असून, आगामी १२ ते १८ महिन्यांत निवडक शेअर्समध्ये ५५ टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पायाभूत सुविधा, आरोग्य आणि ऊर्जा क्षेत्रातील या कंपन्या गुंतवणुकीचा पोर्टफोलिओ चमकवण्यासाठी सज्ज दिसत आहेत.

## चालू वर्षासाठी समभागांच्या शोधात आहात?

**निफ्टीचे नवे लक्ष्य आणि अर्थव्यवस्थेची स्थिती**

ब्रोकरेज संस्थेने डिसेंबर २०२६ पर्यंत निफ्टीसाठी २८,१०० चे उद्दिष्ट कायम ठेवले आहे. भारताची दीर्घकालीन विकासगाथा अद्याप कायम असून, सरकारच्या भांडवली खर्चातील वाढ आणि 'जीएसटी २.०' सारख्या सुधारणांमुळे ग्राहकांमधील मागणीला मोठा वेग मिळाला आहे. जागतिक बाजारपेठांच्या तुलनेत भारतीय बाजारपेठ अधिक सुरक्षित आणि स्थिर असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**हेल्थकेअर आणि पायाभूत सुविधांना पसंती**

गुंतवणुकीसाठी निवडलेल्या पाच समभागांमध्ये 'मॅक्स हेल्थकेअर' (चर वशरश्रींहलरऑश) हे एक प्रमुख नाव आहे. कंपनीने २०२८ पर्यंत आपल्या खाटांची क्षमता ५,००० वरून ९,५०० पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये पुणे, मुंबई आणि लखनऊ येथील प्रकल्पांचा समावेश असून, एकट्या पुण्यात १,००० कोटींहून अधिक गुंतवणूक केली जाणार आहे. सरकारी आरोग्य योजनांच्या दरांमध्ये झालेल्या बदलामुळे कंपनीच्या महसुलात २०० कोटींची भर पडण्याची




**शेअर बाजार**

शक्यता आहे. तसेच, 'कल्पतरू प्रोजेक्ट्स'कडे सध्या ६४,६८२ कोटी रुपयांची विक्रमी ऑर्डर बुक असून, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील वीज वितरण प्रकल्पांमुळे या कंपनीला मोठा फायदा अपेक्षित आहे.

**ऊर्जा आणि औद्योगिक क्षेत्रातील दिग्गज**

'महानगर गॅस'च्या बाबतीत ब्रोकरेज संस्था सकारात्मक असून, आगामी काळात कंपनीच्या विक्रीत १० ते १२ टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. घरगुती आणि औद्योगिक गॅसच्या वाढत्या वापरामुळे पुढील तीन वर्षांत या कंपनीचा नफा वेगाने वाढू शकतो. औद्योगिक पंप निर्मितीतील अग्रेसर 'किर्लोस्कर ब्रदर्स' कडे ३,५६४ कोटींच्या ऑर्डर्स असून, मान्सूननंतर मागणीत होणारी वाढ या कंपनीच्या फायद्याची ठरेल. पाचवे महत्त्वाचे नाव म्हणजे 'आयनॉक्स विंड'. कंपनीने २०२७ पर्यंत २ गिगावॅट वीज निर्मिती क्षमतेचे लक्ष्य ठेवले असून, एनटीपीसी सारख्या मोठ्या सरकारी कंपन्यांसोबत असलेल्या करारामुळे या कंपनीची आर्थिक स्थिती भक्कम आहे.

**गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाचा सल्ला**

ॲक्सिस सिक्युरिटीजने सुचवलेले हे पाचही शेअर्स मध्यम ते दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी योग्य मानले जात आहेत. जरी २०२५ च्या शेवटच्या तिमाहीत काही आव्हाने दिसली असली, तरी २०२६-२७ या आर्थिक वर्षात या कंपन्यांचा चक्रवाढ वार्षिक विकास दर २० ते ४७ टक्क्यांच्या दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे, जोखीम ओळखून आणि तज्ज्ञांचा सल्ला घेऊन या पाच शेअर्सचा विचार करणे फायदेशीर ठरू शकते.

---

**भारतीय भांडवली बाजारासाठी २०२६ हे वर्ष ऐतिहासिक ठरण्याची शक्यता आहे. नवीन युगातील तंत्रज्ञान कंपन्या, ग्राहक ब्रँड्स आणि मोठे युनिकॉर्न्स आपली नोंदणी करण्यासाठी सज्ज झाले आहेत. झेप्टो, फोनपे, फ्लिपकार्ट आणि ओयोची मूळ कंपनी 'प्रिझम' यांसारखी मोठी नावे या शर्यतीत आघाडीवर आहेत.**

## आयपीओंचा महापूर

**झेप्टो:** क्विक कॉमर्स क्षेत्रात वेगाने विस्तारणाऱ्या 'झेप्टो'ने भारतीय रोखे आणि विनिमय मंडळाकडे (सेबी) गोपनीय पद्धतीने आपला मसुदा सादर केला आहे. कंपनीचा आयपीओ जुलै ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आदित पालिचा आणि कैवल्य वोहरा यांनी स्थापन केलेल्या या कंपनीला ऑक्टोबर २०२५ मध्ये 'कॅल्पर्स'च्या नेतृत्वाखाली ४५ कोटी डॉलर्सचा निधी मिळाला, ज्यामुळे कंपनीचे मूल्यांकन ७ अब्ज डॉलर्सवर पोहोचले आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कंपनीचा महसूल ११,१०९ कोटी रुपयांवर पोहोचला असला, तरी तोटा ३,३६७ कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

**प्रिझम (ओयो):** हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील दिग्गज कंपनी 'ओयो'ची मूळ संस्था असलेल्या 'प्रिझम'ने देखील आयपीओसाठी गोपनीय कागदपत्रे दाखल केली आहेत. ६,६५० कोटी रुपये उभारण्यासाठी कंपनीला भागधारकांची मंजुरी मिळाली आहे. या माध्यमातून कंपनीचे मूल्यांकन ७ ते ८ अब्ज डॉलर्सपर्यंत जाण्याची अपेक्षा आहे. २०२१ मध्ये आयपीओ योजना पुढे ढकलल्यानंतर कंपनीने अमेरिकेतील 'जी६ हॉस्पिटॅलिटी'चे अधिग्रहण करून जागतिक स्तरावर विस्तार केला आहे. विशेष म्हणजे, २०२६ च्या पहिल्या तिमाहीत कंपनी नफ्यात आली असून 'मुडीज'ने कंपनीला स्थिर मानांकन दिले आहे.

**फोनपे :** डिजिटल व्यवहार क्षेत्रातील 'फोनपे'ने देखील 'सेबी'कडे आपले कागदपत्रे जमा केली आहेत. १२,००० कोटी रुपयांचा हा संपूर्ण आयपीओ 'ऑफर फॉर सेल' स्वरूपाचा असण्याची शक्यता आहे. यामध्ये वॉलमार्ट, टायगर ग्लोबल आणि मायक्रोसॉफ्ट यांसारखे मोठे गुंतवणूकदार आपली हिस्सेदारी विकू शकतात. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कंपनीचा महसूल ७,११४.८ कोटी रुपये राहिला असून तोटा १,७२७ कोटी रुपयांपर्यंत कमी झाला आहे.




**फ्लिपकार्ट आणि बोट:** वॉलमार्टच्या मालकीच्या 'फ्लिपकार्ट'ने आपला होल्डिंग स्ट्रक्चर सिंगापूरमधून भारतात हलवण्याची प्रक्रिया सुरू केली असून 'एनसीएलटी'ने त्यास मंजुरी दिली आहे. यामुळे मिंत्रा आणि फ्लिपकार्ट मार्केटप्लेस यांसारख्या विभागांचे विलीनीकरण होणार असून आयपीओचा मार्ग मोकळा झाला आहे. दुसरीकडे, वेअरेबल्स ब्रँड 'बोट' दुसऱ्यांदा आयपीओसाठी सज्ज झाला आहे. १,५०० कोटी रुपयांच्या या प्रस्तावात ५०० कोटी रुपयांचे नवीन शेअर्स आणि १,००० कोटी रुपयांचा 'ऑफर फॉर सेल' समाविष्ट आहे.

या व्यतिरिक्त, 'फ्रॅक्टल ॲनालिटिक्स'ला मंजुरी मिळाली असून 'क्युरफूड्स', 'रेंटोमोझो', 'कल्ट फिट' आणि 'शॅडोफॅक्स' यांसारख्या कंपन्या देखील येत्या काळात गुंतवणुकीच्या मोठ्या संधी उपलब्ध करून देणार आहेत.

---

## 'रीटस्'मधील उत्पन्नावर करआकारणी कशी होते?

रीट्समधील उत्पन्न आणि त्यावरील कर आकारणी थेट मालमत्ता खरेदी न करता किंवा तिच्या व्यवस्थापनाचा व्याप न सांभाळता स्थावर मालमत्ता क्षेत्रात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी 'रीअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट' (रीट्स) हा एक



लोकप्रिय पर्याय बनला आहे. कमी भांडवलात मोठ्या प्रमाणावरील रिअल इस्टेट प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याचा हा एक सोपा आणि कार्यक्षम मार्ग आहे. मात्र, 'रीट्स'मधून मिळणारे उत्पन्न करपात्र असते आणि परतावा वाढवण्यासाठी तसेच आर्थिक निर्णय घेण्यासाठी त्यावरील करांचे नियम समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**'रीट्स' म्हणजे काय?**

'रीट्स' अशा संस्था आहेत ज्या उत्पन्न देणाऱ्या रिअल इस्टेट मालमत्तांचे अधिग्रहण, मालकी, व्यवस्थापन किंवा वित्तपुरवठा करतात. हे एखाद्या 'म्युच्युअल फंडा'सारखेच काम करतात, परंतु त्यांचा भर शेअर्स किंवा बॉण्ड्सऐवजी केवळ रिअल इस्टेटवर असतो. अनेक गुंतवणूकदारांकडून निधी गोळा करून, 'रीट्स' व्यक्तींना व्यावसायिक रिअल इस्टेट प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याची संधी देतात. गुंतवणूकदारांना या मालमत्तांमधून मिळणारे भाडे, व्याज किंवा भांडवली नफ्याद्वारे उत्पन्न मिळते.

**स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) म्हणजे काय?**

'एसपीव्ही' म्हणजे अशी कोणतीही भारतीय कंपनी ज्यामध्ये:

(१) 'रीट' कडे किमान ५० टक्के इक्विटी शेअर भांडवल किंवा हिस्सा असतो.

(२) जी आपल्या मालमत्तेपैकी किमान ८० टक्के हिस्सा थेट मालमत्तांमध्ये ठेवते आणि इतर 'स्पेशल पर्पज व्हेईकल'मध्ये गुंतवणूक करत नाही.

(३) जी मालमत्ता धारण करणे आणि विकसित करणे याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामात गुंतलेली नसते.

**भारतातील 'रीट' उत्पन्नावरील करआकारणी**

दुहेरी कर आकारणी टाळण्यासाठी भारताने 'रीट' स्तरावर किंवा गुंतवणूकदार स्तरावर कर आकारणीची व्यवस्था केली आहे:

**१. लाभांश उत्पन्न :** जर 'एसपीव्ही'ने कलम ११५बीएए अंतर्गत सवलतीचा कर दर निवडला असेल, तर लाभांश उत्पन्न युनिट धारकांसाठी त्यांच्या स्लॅब रेटनुसार करपात्र असते. जर ही सवलत निवडली नसेल, तर लाभांश उत्पन्न करमुक्त असते. निवासी युनिट धारकांसाठी लाभांश १०,००० रुपयांपेक्षा जास्त असल्यास (आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून) १० टक्के टीडीएस लागू होईल.

**२. व्याज उत्पन्न :** युनिट धारकांना मिळणारे व्याज उत्पन्न त्यांच्या लागू स्लॅब रेटनुसार करपात्र असते. व्याज उत्पन्न १०,००० रुपयांपेक्षा जास्त असल्यास १० टक्के टीडीएस कापला जातो.

**३. भांडवली नफा :** अल्पकालीन भांडवली नफा (एसटीसीजी): १ वर्षापेक्षा कमी काळ ठेवलेले युनिट्स विकल्यास नफ्यावर २० टक्के कर लागतो.

**दीर्घकालीन भांडवली नफा (एलटीसीजी):** १ वर्षापेक्षा जास्त काळ ठेवलेले युनिट्स विकल्यास, १.२५ लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या नफ्यावर १२.५ टक्के कर लागतो. यामध्ये इंडेक्सेशनचा लाभ मिळत नाही.

**४. भाडे उत्पन्न :** 'रीट्स'द्वारे वितरित केलेले भाडे उत्पन्न युनिट धारकाच्या लागू स्लॅब रेटनुसार करपात्र असते आणि त्यावर १० टक्के टीडीएस कापला जातो.

---


## इंधन अधिभाराचे अर्थगणित

क्रेडिट कार्डचा वापर करून पेट्रोल किंवा डिझेल भरता, तेव्हा तुमच्या बिलात एक अतिरिक्त शुल्क जोडले जाते, ज्याला 'फ्युएल सरचार्ज' (इंधन अधिभार) असे म्हणतात. साधारणपणे हे शुल्क १ ते २.५ टक्क्यांच्या दरम्यान असते. मात्र, दिलासादायक बाब अशी की अनेक बँका हे शुल्क परत करतात, ज्याला 'फ्यूल सरचार्ज वेवर' (अधिभार सवलत) असे म्हटले जाते. ही सुविधा काही अटी आणि मर्यादांच्या अधीन असते, ज्यामुळे वाहनधारकांची दरमहा थोडी बचत होऊ शकते.

तुमच्या कार किंवा बाईकमध्ये इंधन भरण्यासाठी क्रेडिट कार्ड वापरत असाल, तर बिलात 'फ्युएल सरचार्ज' नावाचे अतिरिक्त शुल्क पाहून तुम्हीही कदाचित काळजीत पडला असाल. आधीच इंधनाचे दर वाढलेले असताना हे जास्तीचे पैसे का कापले जात आहेत, असा प्रश्न अनेकांना पडतो. परंतु, बँका हे पैसे तुमच्या खात्यात परत जमा करतात. कार्ड विकताना एजंट या सुविधेचा एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून उल्लेख करतात. ही प्रणाली नेमकी कशी कार्य करते, ते आपण समजून घेऊया.

**इंधन अधिभार का आकारला जातो?**

जेव्हा तुम्ही कार्डद्वारे पैसे भरता, तेव्हा पेट्रोल पंप मालकाला बँक आणि




कार्ड नेटवर्कला (उदा. व्हिसा किंवा मास्टरकार्ड) व्यवहार शुल्क (ट्रांझॅक्शन फी) द्यावे लागते. पेट्रोल आणि डिझेलवरील नफ्याचे प्रमाण (मार्जिन) अत्यंत कमी असल्याने, पंप मालक या शुल्काचा बोजा स्वतः न सोसता तो ग्राहकांवर टाकतात. यामुळेच बिलात वेगळा अधिभार जोडला जातो.

**सवलत कशी मिळते?**

डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी बँका हा अधिभार स्वतःच्या खिशातून सोसतात. जेव्हा तुम्ही पेट्रोल पंपावर कार्ड वापरता, तेव्हा सुरुवातीला अधिभारासह संपूर्ण रक्कम कापली जाते. त्यानंतर १ ते ३ दिवसांत किंवा पुढच्या महिन्याच्या विवरणपत्रात बँक ती अधिभाराची रक्कम तुमच्या कार्डवर परत जमा (रिव्हर्स) करते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, बँका केवळ अधिभाराची मूळ रक्कम परत करतात, त्यावरील 'जीएसटी' परत मिळत नाही.

**डेबिट कार्ड आणि रोख रकमेसाठी काय नियम आहेत?**

डेबिट कार्डवरही इंधन अधिभार लागू शकतो. काही बँका यावर सवलत देतात, परंतु त्याचे नियम क्रेडिट कार्डच्या तुलनेत अधिक कडक असू शकतात.

जर तुम्ही रोखीने व्यवहार केला, तर कोणताही अधिभार लागत नाही, कारण त्यात कोणत्याही बँक किंवा नेटवर्कचे शुल्क समाविष्ट नसते.

**सवलत मिळवण्यासाठी आवश्यक अटी**

- **व्यवहार मर्यादा:** सहसा ही सवलत तेव्हाच मिळते जेव्हा तुम्ही किमान ४०० रुपये ते कमाल ४,००० किंवा ५,००० रुपयांपर्यंतचे इंधन भरता.
- **मासिक मर्यादा:** एका महिन्यात तुम्ही जास्तीत जास्त किती रक्कम परत मिळवू शकता, याची एक मर्यादा (उदा. १०० किंवा २५० रुपये) निश्चित केलेली असते.


काही कार्डे केवळ विशिष्ट तेल कंपन्यांच्या (उदा. एचपीसीएल किंवा बीपीसीएल) पंपांवरच ही सुविधा देतात.

---

## आयटीसीच्या समभागात घसरण कशामुळे?

केंद्र सरकारने सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांवरील उत्पादन शुल्कात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतल्याचा जोरदार फटका 'आयटीसी' या बड्या कंपनीला बसला आहे. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच अवघ्या दोन व्यापारी सत्रांमध्ये आयटीसीच्या समभागात १४ टक्क्यांहून अधिक घसरण झाली असून, याचा सर्वाधिक फटका भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीला सोसावा लागला आहे. या घसरणीमुळे एलआयसीच्या गुंतवणुकीचे मूल्य दोन दिवसांत सुमारे ११,४६८ कोटी रुपयांनी घटले आहे.

संसदेने नुकत्याच संमत केलेल्या 'केंद्रीय उत्पादन शुल्क (सुधारणा) विधेयक २०२५' मुळे सिगारेटवरील करात वाढ झाली आहे. या निर्णयाच्या धास्तीने गुंतवणूकदारांनी आयटीसीच्या समभागांची मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू केली. २ जानेवारी रोजी या कंपनीचा समभाग पाच टक्क्यांनी कोसळून ३४५.२५ रुपयांच्या ५२ आठवड्यांतील नीचांकी पातळीवर पोहोचला. यामुळे कंपनीच्या बाजार भांडवलात सुमारे ७२,००० कोटी रुपयांची घट होऊन ते ४,३८,६३९ कोटी रुपयांवर आले आहे.




**जाणून घ्या**

आयटीसीमध्ये कोणत्याही प्रवर्तकाची भागीदारी नसून शंभर टक्के हिस्सा सार्वजनिक भागधारकांकडे आहे. यामध्ये एलआयसीची १५.८६ टक्के भागीदारी असून ३१ डिसेंबर रोजी या गुंतवणुकीचे मूल्य ८०,०२८ कोटी रुपये होते, जे आता घसरून ६८,५६० कोटी रुपयांवर आले आहे. केवळ एलआयसीच नव्हे, तर 'जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' (जीआयसी) आणि 'न्यू इंडिया अश्युरन्स' या कंपन्यांनाही मोठा फटका बसला आहे. जीआयसीची कंपनीत १.७३ टक्के भागीदारी असून त्यांचे १,२५४ कोटींचे नुकसान झाले आहे, तर 'न्यू इंडिया अश्युरन्स'च्या १.४ टक्के भागीदारीचे मूल्य १,०१८ कोटी रुपयांनी कमी झाले आहे. अशा प्रकारे या तीन सरकारी विमा कंपन्यांचे एकूण १३,७४० कोटी रुपयांचे आभासी नुकसान झाले आहे.

करवाढीमुळे सिगारेटच्या किमती वाढण्याची शक्यता असल्याने विक्रीवर परिणाम होईल, असा अंदाज बाजार विश्लेषकांनी व्यक्त केला आहे. ग्राहकांकडून स्वस्त पर्यायांचा शोध घेतला जाण्याची शक्यता असल्याने ब्रोकरेज संस्थांनी या समभागाबाबत सावध पवित्रा घेतला आहे.

गेल्या सहा महिन्यांत आयटीसीच्या समभागात १५ टक्क्यांहून अधिक घसरण झाली आहे. मात्र, कंपनीचा हॉटेल आणि दैनंदिन उपभोग्य वस्तूंचा (एफएमसीजी) व्यवसाय विस्तारलेला असल्याने दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी काही तज्ज्ञांनी सकारात्मकताही दर्शवली आहे. दरम्यान, आयटीसीमध्ये घसरण होत असताना विमा कंपन्यांच्या स्वतःच्या समभागांमध्ये मात्र शुक्रवारी किरकोळ सुधारणा दिसून आली.

---

### म्युच्युअल फंडातून मिळणाऱ्या

## उत्पन्नावरील करबचतीसाठी...

भारतीय गुंतवणूकदारांमध्ये गेल्या काही वर्षांत म्युच्युअल फंडांविषयी मोठी जागृती झाली आहे. नोव्हेंबर २०२५ पर्यंत भारतात एकूण सक्रिय एसआयपी खात्यांची संख्या साधारण ९.४ ते १० कोटींच्या आसपास आहे. मात्र, केवळ गुंतवणूक करणे पुरेसे नसते; तर त्यातून मिळणारा परतावा कराच्या कात्रीतून वाचवणे हे खऱ्या अर्थाने बुद्धिकौशल्याचे काम आहे. आजही ३० टक्क्यांहून कमी गुंतवणूकदार आपल्या गुंतवणुकीचे कर नियोजन सक्षमपणे करतात.

**नवीन बदल आणि नियम**

कोणत्याही गुंतवणुकीचा विचार करताना 'करोत्तर परतावा' (पोस्ट-टॅक्स रिटर्न) किती मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे असते. भांडवली नफ्यावरील (कॅपिटल गेन्स) कर खालीलप्रमाणे आकारला जातो:

**१. इक्विटी म्युच्युअल फंड (समभाग आधारित):** १२ महिन्यांच्या आत गुंतवणूक काढल्यास २० टक्के अल्पकालीन भांडवली नफा कर (एसटीसीजी) द्यावा लागतो. जर गुंतवणूक १ वर्षापेक्षा जास्त काळ राखली, तर १.२५ लाख रुपयांवरील नफ्यावर १२.५ टक्के दीर्घकालीन भांडवली नफा कर (एलटीसीजी) लागू होतो.

**टॅक्स झोन**




**२. डेट म्युच्युअल फंड (कर्जरोखे आधारित):** या फंडातील नफा हा गुंतवणूकदाराच्या एकूण उत्पन्नात मिळवला जातो आणि त्याच्या कर पात्रतेनुसार (इन्कम टॅक्स स्लॅब) त्यावर कर आकारला जातो.

**३. ईएलएसएस (कर बचत योजना):** यात कलम ८०सी अंतर्गत १.५ लाखांपर्यंतच्या गुंतवणुकीवर कर सवलत मिळते. याचा 'लॉक-इन' कालावधी ३ वर्षांचा असतो.

**कर बचतीसाठी महत्त्वाच्या टिप्स**

सवलतीच्या मर्यादेचा वापर: प्रति आर्थिक वर्ष १.२५ लाख रुपयांपर्यंतचा दीर्घकालीन नफा करमुक्त असतो. त्यामुळे दरवर्षी थोड्या प्रमाणात नफा काढून पुन्हा गुंतवणूक केल्यास भविष्यातील कराचा बोजा कमी होतो. यालाच 'टॅक्स हार्वेस्टिंग' असे म्हणतात.

**तोटा आणि नफा यांची सांगड:** जर एखाद्या फंडात तोटा झाला असेल, तर तो विकून तुम्ही इतर फंडांतील नफ्याशी त्याची सांगड घालू शकता (कॅपिटल लॉस हार्वेस्टिंग). यामुळे तुमचा निव्वळ करपात्र नफा कमी होतो.

**नियोजित विक्री:** ऐनवेळी मोठी रक्कम काढण्यापेक्षा ती वेगवेगळ्या आर्थिक वर्षांत विभागून काढल्यास दरवर्षी मिळणाऱ्या सवलतीचा फायदा घेता येतो.

**वारंवार फंड बदलणे टाळा:** एका फंडातून दुसऱ्या फंडात गुंतवणूक वळवणे हा 'विक्री आणि पुनर्खरेदी' असाच व्यवहार मानला जातो. यामुळे विनाकारण भांडवली नफा कर लागू होऊ शकतो.

थोडक्यात सांगायचे तर, केवळ शिस्तबद्ध गुंतवणूक तुम्हाला श्रीमंत करत नाही, तर योग्य कर नियोजन तुमची संपत्ती सुरक्षित ठेवते. गुंतवणूक करण्यापूर्वी आपल्या आर्थिक सल्लागाराशी चर्चा करून 'कर कार्यक्षमता' तपासणे केव्हाही हिताचे ठरते.

---

**जाणून घ्या**

## सोन्यातून बाहेर पडून बाजारात गुंतवणूक करावी का?

मावळते वर्ष मौल्यवान धातूंसाठी अत्यंत लाभदायी ठरले. या वर्षात सोने आणि चांदीने गेल्या काही दशकांतील उच्चांकी परतावा देऊन शेअर बाजाराला (इक्विटी) मागे टाकले. चांदीने वर्षभरात सुमारे १३८% तर सोन्याने जवळपास ७५ टक्के वाढ नोंदवली, जी सोन्याची मागील ४० वर्षांतील सर्वोत्तम कामगिरी ठरली. याउलट, 'निफ्टी ५०' ने केवळ एका अंकी परतावा दिला.

आता २०२६ कडे वाटचाल करताना गुंतवणूकदारांच्या मनात प्रश्न आहे की, पुन्हा एकदा शेअर बाजाराचे दिवस परतणार का? तज्ज्ञांच्या मते, २०२५ मध्ये सोने-चांदीतील तेजीला जागतिक अस्थिरता, मध्यवर्ती बँकांची सोने खरेदी आणि वाढती महागाई ही कारणे होती. मात्र, अशा प्रकारचा असामान्य परतावा दरवर्षी मिळणे कठीण असते. अशा वेळी 'इक्विटी-टू-गोल्ड रेशो' (शेअर बाजार आणि सोन्याचे गुणोत्तर) हे गुंतवणुकीचे महत्त्वाचे साधन ठरते.




अभ्यासकांच्या मते, शेअर बाजार आणि सोने हे दीर्घकालीन चक्रांनुसार चालतात. कधी इक्विटी वरचढ ठरते, तर कधी सोन्याचे वर्चस्व असते. सेन्सेक्सला सोन्याच्या किमतीने भागले असता 'इक्विटी-गोल्ड रेशो' मिळतो.

गेल्या चार दशकांचा इतिहास पाहिल्यास, जेव्हा हा रेशो खालच्या स्तरावर असतो, तेव्हा शेअर बाजार सोन्यापेक्षा चांगली कामगिरी करतो. जेव्हा हा रेशो वरच्या स्तरावर जातो, तेव्हा सोने आघाडी घेते. १८ डिसेंबर २०२५ पर्यंतचा विचार करता, 'गोल्ड-टू-सेन्सेक्स रेशो' १.४ वर आहे. याचा अर्थ शेअर बाजाराच्या तुलनेत सोने सध्या महाग झाले आहे. गेल्या अडीच वर्षांत सोन्याने भारतीय रुपयात सुमारे १७०% वाढ नोंदवली आहे, जी खूप मोठी झेप आहे.

अशा परिस्थितीत, आता शेअर बाजार पुन्हा एकदा सोन्याला मागे टाकण्याची शक्यता वाढली आहे.ऐतिहासिक आकडेवारी काय सांगते? दीर्घकालीन आकडेवारीनुसार, जेव्हा सेन्सेक्स-गोल्ड रेशो ०.५ ते ०.७ च्या दरम्यान असतो, तेव्हा शेअर बाजाराने सरासरी १६ ते ३१ टक्के वार्षिक परतावा दिला आहे. जेव्हा हा रेशो १.१ ते १.३ च्या वरच्या पट्ट्यात जातो, तेव्हा सोन्याने सरासरी २० टक्के परतावा दिला असून शेअर बाजाराची कामगिरी खालावली आहे.

**२०२६ साठी धोरण काय असावे?**

सध्याची स्थिती पाहता २०२६ मध्ये शेअर बाजार सोन्याच्या तुलनेत अधिक सरस कामगिरी करण्याची शक्यता वाढली आहे. याचा अर्थ असा नाही की सोन्याच्या किमतीत मोठी घसरण होईल, तर सोने काही काळ स्थिर राहू शकते किंवा त्यात संथ गतीने वाढ होऊ शकते. तज्ज्ञांच्या मते, गुंतवणूकदारांनी सोन्यातून पूर्णपणे बाहेर पडू नये, कारण सोने हे जागतिक जोखीम आणि चलनवाढीविरुद्धचे एक महत्त्वाचे संरक्षण कवच आहे. मात्र, २०२५ च्या तेजीमुळे ज्यांच्या पोर्टफोलिओमध्ये सोन्याचे प्रमाण प्रमाणाबाहेर वाढले आहे, त्यांनी हळूहळू आपला कल पुन्हा शेअर बाजाराकडे वळवणे किंवा पोर्टफोलिओचे पुनर्संतुलन करणे फायदेशीर ठरेल. २०२६ मध्ये भावनेच्या आहारी जाऊन मोठे बदल करण्यापेक्षा शिस्तबद्ध गुंतवणूक आणि विविधीकरण हेच यशाचे सूत्र ठरणार आहे.

# ‘आयकॉन’मधील ‘कलर्स ऑफ करेज’मध्ये उलगडल्या थोर व्यक्तीमत्वांच्या जीवनगाथा

## शाळेतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांचे सुंदर सादरीकरण



‘आयकॉन’मधील ‘कलर्स ऑफ करेज’मध्ये उलगडल्या थोर व्यक्तीमत्वांच्या जीवनगाथांवर शाळेतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांचे सुंदर सादरीकरण केले.

नगर – आयकॉन पब्लिक स्कूल येथे दोन दिवस सादर झालेल्या ‘कलर्स ऑफ करेज’ कार्यक्रमात सामान्य परिस्थितीतून पुढे येत समाजासाठी असामान्य काम करून समाजातील उणिवा दूर करण्यासाठी योगदान देणाऱ्या महान व्यक्तीमत्वांच्या जीवन गाथा उलगडल्या. शाळेतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी यात सहभागी होऊन थोर व्यक्तीमत्वांच्या कार्याचे जीवंत सादरीकरण केले. प्रत्येक व्यक्तीमत्वापासून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यातील वाटचालीचा संस्कारीत पाया भक्कम केला. दीड तास सलग दृकश्राव्य स्वरूपात हा अद्भुत कार्यक्रम सादर झाला. दोन दिवस सादर झालेल्या या कार्यक्रमाला ४ हजारांहून अधिक पालक, मान्यवर, नागरिकांनी हजेरी लावून मुलांच्या सर्जनशीलतेचे आणि शाळेचे कौतुक केले.

आयकॉन पब्लिक स्कूल क्रमिक शिक्षण देतानाच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत समाजासाठी भरीव योगदान देणारे व्यक्तिमत्त्व खरेखुरे हिरो असतात. अशा व्यक्तीमत्वांच्या जीवन कार्याचा सखोल अभ्यास करून आणि त्यांच्यातील उत्कृष्ट गुण आत्मसात करत मुलांनी अतिशय सुंदर सादरीकरण केले. जवळपास दोन महिने विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी ’धैर्य’ या संकल्पनेवर सखोल चर्चा, विचारमंथन व आत्मचिंतन केले. वर्गखोल्या व शिक्षक कक्ष केवळ अध्यापनाचेच नव्हे, तर संस्कारांचे केंद्र बनले. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव अधिक बळकटी झाली.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पॅराऑलिम्पिक खेळाडू दीपा मलिक, स्नेहालयचे डॉ. गिरीश कुलकर्णी, ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ, पद्मश्री पोपटराव पवार, स्वाती महाडिक, तुलसी गौंडा, भॅवरी देवी, सुभाषणी मिस्त्री, दशरथ मांजी, शेखर नाईक अशा अनेक दिग्गजांचे समाजाठीचे कार्य स्वतः आत्मसात करून विद्यार्थ्यांनी ते भव्य व्यासपीठावर सादर केले.

स्नेहलयाचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्या आयुष्यातील निर्णायक वळणाचे संवेदनशील चित्रण. स्नेहलय संस्थेला पाठिंबा देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम साकारण्यात आला असून, या कार्यक्रमातून मिळणारे उत्पन्न संस्थेला देण्याचा प्रस्ताव आहे. गीत संगीत, आकर्षक प्रकाश योजना, दृकश्राव्य माध्यम आणि कलाकारांचा उत्कृष्ट अभिनय या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

या कार्यक्रमास पद्मश्री पोपटराव पवार, डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्यासह सशस्त्र दलातील अधिकारी, निवृत्त सैनिक तसेच शिक्षण, समाजकार्य, प्रशासन, शरद मुथा एज्युकेशन ट्रस्टचे विश्वस्त अशोक मुथा, निर्मल मुथा, अमित मुथा, संचालक कर्नल आर. सी. राणा, आराधना राणा, प्राचार्या दीपिका नगरवाला आदींची उपस्थिती लाभली.



डोके विद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, डॉ. ऋतुजा रणदिवे, डॉ.आदिती पाटोळे, डॉ.रजत येवले, शिक्षकवृंद विद्यार्थी आदी (छाया– विजय मते)

# विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून नववर्षाचे स्वागत

नगर – निर्मलनगर येथील सौ. लक्ष्मीबाई शांताराम डोके शाळेत सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून नव वर्षाचे स्वागत आणि संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर ठेऊन ग्रामस्वच्छता अभियान व खेळांच्या विविध क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनपाच्या आरोग्य विभागाचे डॉ. ऋतुजा रणदिवे ह्या उपस्थित होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.आदिती पाटोळे, डॉ. रजत येवले, परिचारिका सौ.स्वाती कांबळे, तसेच पॅथॉलॉजी डॉ.सना सय्यद, आशासेविका वैशाली धनवडे, चंद्रकला धनवडे, वर्षा महामुनी, योगिता ढवण, अफसाना शेख उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरून बोलतांना डॉ. रणदिवे यांनी सांगितले की, मुलांनी सकस आहार घ्यावा. मोबाईल चा वापर जास्त प्रमाणात न करता मैदानात विविध खेळ खेळावेत. तसेच व्यायामाचे महत्व सांगितले स्वच्छते विषयी जागरूक राहण्याचे आवाहन केले.

या वेळी शाळेजवळील आसपासचा परिसर स्वच्छ करून ग्रामस्वच्छता अभियान राबविन्यात आले. तसेच शालेय विविध क्रिडा स्पर्धा पार पडल्या यामधे लंगडी, खो खो, कबड्डी, वैयक्तिक धावणे, अशा स्पर्धा घेण्यात आल्या.

यावेळी विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे यांनी सर्व नियोजन केले होते. प्रास्ताविक साई विद्यालय मुख्याध्यापक संभाजी पवार यांनी केले. सूत्रसंचलन मंदाकिनी पांडुळे यांनी केले. कार्यक्रमास सांस्कृतिक विभागप्रमुख ज्योती पवार, मंजू नवगिरे, आशा धामणे, संज्योत बर्वे, सुजाता कर्डिले, राणी राऊत, सुप्रिया वाळके, भरत जगदाळे, शिक्षक, शिक्षिकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# साठवलेली तब्बल २८ लाखांची पुंजी मरणोत्तर सामाजिक संस्थांना दान



अमोलकचंद भंडारी

नगर –जैन समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती म्हणून ख्याती असणारे अमोलकचंद भंडारी यांचे नुकतेच निधन झाले. निधनाच्या दहा दिवसांपूर्वीच त्यांनी साठविलेली तब्बल २८ लाख रुपयांची पुंजी ही विविध क्षेत्रात काम करणाजया सामाजिक संस्थांना दान केली आहे.

गेल्या काही वर्षांपासून बचत करुन पैसे साठविले होते. त्या पैशांचा सामाजिक कार्यासाठी उपयोग व्हावा या उदात्त हेतूने त्यांनी मुलांकडे अंतिम इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांनी आठ ते दहा दिवसांपूर्वीच हयात असतानाच विविध संस्थांना धनादेश दिले. चार संस्थांना अमोलकचंद भंडारी यांना देणगी द्यायची होती त्याची तयारी त्यांनी अगोदरच केली होती. त्यानुसार त्यांची मुले उद्योजक हेमंत भंडारी आणि विरेंद्र भंडारी यांनी दान केले.

गोरगरीबांसाठी अल्प दरात आरोग्याच्या तपासणी उपलब्ध करुन देणाजया अरण्येश्वर येथील गुरु गौतम डायलिसीस सेंटर, ज्या गाई दुध देत नाहीत.अपंग देशी गाई यांना कसायापासून वाचवून गोवंशाचा सांभाळ करणाऱ्या गुरु माॅ.डॉ.मंजुश्री गोशाळा भिवरी, ज्या वृध्दांना अपत्य नाहीत अशांचा सांभाळ करणाजया शांताई वृध्दाश्रम बेळगाव आणि आर्टीफिशियल इंटीलिजंस अर्थात एआय वरती आधारीत भारतात सर्वात चांगले काम करणाजया प्रयागराज येथील संस्थेशी इस्त्रौशी करार करुन तंत्रज्ञानाचा वापर करणाजया वर्धमान महावीर नॉलेज पार्क अहिल्यानगर या संस्थांना दान केली.

या चारही संस्थांना प्रत्येकी सात लाख रुपयांचे दान केले आहे. गुरु गौतम डायलिसीस सेंटरचे संस्थापक सतीश बनवट, अध्यक्ष ललीत जैन, गोशाळेचे प्रकाश संचेती, शीतल भंडारी, वृध्दाश्रमाचे विजय पाटील, विजय मोरे आणि नॉलेज पार्कचे प्रेमराज बोथरा यांच्यासह हेमंत भंडारी आणि विरेंद्र भंडारी तसेच भंडारी परिवार उपस्थित होते.

# मार्कंडेय मंदिराच्या पहिल्या स्लॅबच्या कामाचा शुभारंभ



शहरातील पुरातन श्री मार्कंडेय महामुनींच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सध्या सुरु आहे. मंदिराच्या पहिल्या स्लॅबच्या कामाचा शुभारंभ पद्मशाली समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते विधिवत पूजा करून झाला.

नगर – शहरातील गांधी मैदान येथील १०० वर्षाहून अधिक पुरातन असलेल्या श्री मार्कंडेय महामुनींच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सध्या सुरु आहे. या मंदिराच्या पहिल्या स्लॅबच्या कामाचा शुभारंभ पद्मशाली समजातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते पुरोहितांच्या मंत्रोच्चारात विधिवत पूजा करून झाला. पद्मशाली समजातील नागरिकांची स्वप्नपूर्ती होत असल्याने सर्वांना आनंद झाला असल्याच्या भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केल्या.

यावेळी पद्मशाली समाजातील ज्येष्ठ नागरिक राधाकिसन म्याना, धनंजय येनगुपटला, प्रकाश येनगंदुल, कुमार आडेप, मल्लेशाम ईगे, अशोक सब्बन, माजी मुख्याध्यापक बाळकृष्ण सिद्धम, सुरेखा विद्ये, भीमराज कोडम यांच्यासह मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम व पंच कमिटी पद्मशाली ज्ञाती समाज ट्रस्टचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी व पद्मशाली समाजतील नागरिक उपस्थित होते.

प्रास्ताविकात श्रीकांत छिंदम म्हणाले, काही समाज कंटकांना या श्री मार्कंडेय महामुनींच्या मंदिराचा जीर्णोद्धार होऊच नये असे वाटत असल्याने अनेक अडथळे व संकटांवर मात करून या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सध्या वेगाने सुरु आहे. छिंदम परिवाराच्या वतीने मंदिराच्या बांधकामासाठी लागणारे सर्व मटेरियल दिले जात आहे. या कामामुळे शहरातील पद्मशाली समाज एकवटला आहे. अशीच एकजूट कायम ठेऊन समाज विद्रोहींना लांब ठेवा, असे आवाहन केले.

यावेळी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी बाळकृष्ण सिद्धम, राधाकिसन म्याना तसेच पद्मशाली पुरोहित संघम् यांच्यावतीने मोठ्या रकमांची मदत देण्यात आली. तसेच समाजातील सर्व नागरिकांनी या कामास तनमनधनाने हारभार लावण्याचे आवाहन करून पद्मशाली समजाचे आराध्य दैवत मार्कंडेय महामुनींच्या मंदिराचे काम होत असल्याने छिंदम बंधूंनी दिलेला शब्द पूर्ण केला आहे, अशाही भावना व्यक्त केल्या.

यावेळी हरिभाऊ येळदंडी, विजय सब्बन, दीपक कोटा, मार्कंडेय पतसंस्थेचे चेअरमन नारायण कोडम, विनोद गुंडू तसेच समाजातील पुरोहित संघाचे व विद्या प्रसारक मंडळ सर्व पदाधिकारी नागारिक उपस्थित होते.

# नगर एमआयडीसीतील मालमत्ता कर आणि घनकचरा प्रश्नांवर जिल्हाधिकारी, आमी संघटना व ग्रामपंचायतींमध्ये सखोल चर्चा



एमआयडीसीतील मालमत्ता कर व घनकचरा प्रश्नांवर आयोजित बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

नगर – नगर एमआयडीसी परिसरातील उद्योजकांवर मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ३० टक्के वाढीव मालमत्ता कर आकारण्यात आल्याने मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होत आहे. या वाढीव मालमत्ता कराबाबत तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद सीईओ, निंबळक ग्रामपंचायत, नागापूर ग्रामपंचायत आणि आमी संघटना यांच्यात तब्बल दोन तास चर्चा झाली. मात्र या बैठकीत समाधानकारक तोडगा निघू शकला नाही.

बैठकीचे प्रास्ताविक आमी संघटनेचे संजय बंदिष्टी यांनी केले. त्यांनी एमआयडीसीतील उद्योजकांना येणाऱ्या वाढीव मालमत्ता करासह घनकचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी सविस्तरपणे मांडल्या.

यावेळी जिल्हा परिषद सीईओ आनंद भंडारी यांनी उपस्थित उद्योजकांशी संवाद साधत गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. उद्योजक टिकला तरच कामगार आणि ग्रामपंचायतही टिकेल, अशी भावना व्यक्त करत त्यांनी निंबळक व नागापूर ग्रामपंचायतींना सूचित केले की, मालमत्ता कर जास्त वाटत असल्यास संबंधित मालमत्ता धारकांसमोर पुनर्मोजणी करून योग्य तो कर आकारावा. काही अधिकार माझ्या हातात आहेत, मात्र सरकारचा जो निर्णय येईल तो स्वीकारावा लागेल; तरीही मी माझ्या पातळीवर पूर्ण प्रयत्न करीत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी उद्योगांचे प्रश्न गांभीर्याने समजून घेत मालमत्ता कराबाबत शासनस्तरावर चर्चा करून काही बदल करता येतात का, ते पाहण्याचे आश्वासन दिले. मात्र मालमत्ता कर वसूल होणे अत्यावश्यक असून त्याशिवाय ग्रामपंचायती चालू शकणार नाहीत, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

घनकचऱ्याच्या प्रश्नावर बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी आरोग्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असे स्पष्ट केले. एमआयडीसीतील काही रस्त्यांवर कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले असून त्याची तातडीने विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. निंबळक किंवा नागापूर ग्रामपंचायतीकडे जागा उपलब्ध असल्यास शासनाला कळवावे, डीपीडीसीच्या माध्यमातून त्या ठिकाणी कचरा संकलन केंद्र उभारता येईल. यामुळे दोन्ही गावांचा फायदा होईल, रोजगारनिर्मिती होईल तसेच खतनिर्मितीही शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

तसेच एमआयडीसीतील हॉटेल व्यावसायिकांना कचरा रस्त्यावर न टाकण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले. ओला व सुका कचरा वेगळा करण्यास तातडीने सुरुवात करावी, त्यामुळे कचरा संकलन सुलभ होईल, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले. यावेळी आमी संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रज्ञावंतांच्या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षपदी अ‍ॅड. राजेश कावरे

## चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात होणार विविध क्षेत्रातील प्रज्ञावंतांचा गौरव



नगर – स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती तसेच राष्ट्रीय युवा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर निमगाव वाघा (ता. नगर) येथील परिवार मंगल कार्यालयात १२ जानेवारी रोजी चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात पार पडणार आहे. ग्रामीण भागातील साहित्य, संस्कृती, सामाजिक जाणिवा व नव्या विचारांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रज्ञावंतांचा राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार आहे.

या प्रज्ञावंतांच्या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी भारत सरकारचे नोटरी व अहिल्यानगर मराठा पतसंस्थेचे विधीज्ञ अ‍ॅड. राजेश दत्तात्रय कावरे यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. ग्रामीण साहित्य चळवळीला चालना देण्याबरोबरच सामाजिक प्रबोधन व युवकांमध्ये सकारात्मक विचारांची बीजे रोवणे, हा या संमेलनामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

अ‍ॅड. राजेश कावरे हे अहमदनगर बार असोसिएशन तसेच कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे माजी खजिनदार असून सध्या ते कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या सचिव पदाची जबाबदारी पार पाडत आहेत. अ‍ॅड. राजेश कावरे हे अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी पतसंस्थेच संचालक असून ते नोटरी पब्लिक भारत सरकार आहेत. विधी क्षेत्रात त्यांचा प्रदीर्घ अनुभव असून न्यायालयीन कामकाजाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या विविध उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. अनेक सामाजिक संघटनांमध्ये ते योगदान देत असून, न्याय, समता व सामाजिक सलोखा या मूल्यांसाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. या साहित्य संमेलनाच्या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात अ‍ॅड. राजेश कावरे यांच्या हस्ते सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग व पर्यावरण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.



शाकंभरी पौर्णिमेनिमित्त शनिवारी बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात आकर्षक सजावट करून मंदिराचा गाभारा सजवण्यात आला होता. यावेळी शेकडो महिला भाविकांनी दुर्गा सप्तशतीचा पाठ केला.

# शाकंभरी पौर्णिमेनिमित्त बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात सप्तशती पाठ

नगर – शाकंभरी पौर्णिमेनिमित्त शनिवारी बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने तुळजाभवानी देवीला महाअभिषेक करून शाकंभरी रुपात पूजा करून सुवर्ण अलंकार अर्पण करण्यात आले. तसेच विविध प्रकारचे फळे, भाज्या आणि पुष्पांची आकर्षक सजावट करून मंदिराचा गाभारा सजवण्यात आला होता. तुळजाभवानी देवीचे प्रसन्न व सजलेल्या रूपाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी केली होती. शाकांभरी देवी ही अन्नपूर्णेचे रूप मानली जाते, अशी माहिती मंदिराचे पुजारी अ‍ॅड. विजय भगत यांनी दिली.

शाकंभरी पौर्णिमा निमित्त शेकडो महिला भाविकांनी दुर्गा सप्तशतीचा पाठ केला. पारंपरिक पोशाखात महिलांनी मंत्रोच्चार करत देवीची आराधना केली. या पठणाने मंदिरात अध्यात्मिक उर्जा आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

दुपारी तुळजाभवानी देवीचा होम आरती करून देवीस महानैवेद्य दाखवून भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मंदिराचे पुजारी अ‍ॅड. अभिषेक भगत, कुणाल भगत, वेद भगत आदींसह भगत परीवरातील व परिसरातील देवीभक्त भाविक उपस्थित होते.

# बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या स्टॉलवर हजारोंची उलाढाल

## सारोळा कासार शाळेचा उपक्रम, पालक व ग्रामस्थांकडून स्वागत व कौतुक



सारोळा कासार जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करताना सरपंच आरती कडूस व पदाधिकारी.

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिला मेळावा, विविध कलाकृती दालन प्रदर्शन तसेच बाल आनंद मेळावा शाळेत घेण्यात आला. यास ग्रामस्थ व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बालआनंद मेळाव्यात सुमारे ४५ हजार रुपयांची उलाढाल झाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच आरती कडूस यांच्या हस्ते तर विविध दालनाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा विद्या धामणे तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष किशोर हारदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संजय धामणे, आरिफ शेख, निखिल गट, अतुल काळे, ग्रामस्थ मोहन काळे, सचिन कडूस, पोपट काळे, सुरेश पुंड, बाबासाहेब धामणे, सतीश कडूस, संजय पाटील, सतीश गट, माजी उपसरपंच उषाताई गट, दत्तात्रय कडूस, मच्छिंद्र धामोरे, दीपक पुंड, विजय धामणे, दिपक कडूस, पालक, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सावित्रीबाई फुले जयंती यानिमित्त होय मी सावित्री बोलते या विषयावर संस्कृती धामणे या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध कलाकृती दालनामध्ये त्यांनी लावलेल्या विविध वस्तू पाहून ग्रामस्थ व पालक भारावून गेले.त्याचप्रमाणे शाळेच्या प्रांगणामध्ये लावलेल्या दुकानांना भेटी दिल्या वस्तू खरेदी केल्या. या मेळाव्यात विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष खरेदी विक्रीचा अनुभव मिळाला. या उपक्रमाचे सर्व उपस्थित पदाधिकारी, पालक व ग्रामस्थ यांनी कौतुक केले.

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यावहारिक ज्ञान यावे तसेच खाजगी शाळेच्या तुलनेत जि प शाळा विविध उपक्रमात मागे नाही हा उद्देश या निमित्ताने सफल झाला. ग्रामीण भागातील जि प शाळेचा कार्यक्रम हा लक्षवेधी ठरला. शालेय जीवनात शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान देखील येणे गरजेचे आहे. तसेच आनंदी बाजारात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल लावून स्वतः बनवलेल्या पदार्थांची विक्री केली त्यातून दोन पैसे मिळवले हे व्यवहार ज्ञान मुलांना यातून मिळाले. तसेच त्याच्या सुप्त गुणांना वाव या विविध उपक्रमातून मिळत असतो. हाच उद्देश विविध कला प्रदर्शन व बाल आनंद मेळावा भरवण्याचा असल्याची प्रतिक्रिया शाळेचे मुख्याध्यापक वैजीनाथ धामणे यांनी दिली.

कार्यक्रम यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक बाबासाहेब धामणे,सविता लोंढे, ज्योती धामणे, माध्यमिक शिक्षक अडेप सर शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी सहकार्य केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

